अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. ११ जून २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २५२ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

सुराज्य/पुणे

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा ३३८ वा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्ती भावामध्ये संपन्न झाला. तुकोबांच्या पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले आहे. पालखीचा आजचा मुक्काम हा इनामदार वाड्यात असेल. पुन्हा उद्या ही पालखी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होईल. देहूतून बाहेर पडताच अनगडशहा बाबा या ठिकाणी पालखीची आरती होईल. ज्ञानोबा- माऊली तुकारामाच्या गजरात वारकरी पंढरपूरच्या दिशेने वाटचाल करतील त्यानंतर



तुकोबांची पालखी पिंपरी- चिंचवड शहरातील आकुर्डीतील विठ्ठल मंदिरात मुक्कामी असेल. टाळ- मृदुंगाच्या गजरात हजारो भाविक देहूत दाखल झाले असून मोठ्या उत्साहात आणि भक्ती भावामध्ये तुकोबांच्या पालखीचे पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान झाले आहे. शनिवारपासूनच देहू नगरीत शेकडोच्या संख्येने वारकरी दाखल झाले होते. आज सकाळी देखील इंद्रायणी नदीमध्ये पवित्र स्नान करून वारकऱ्यांनी तुकोबांचे दर्शन घेतलं. पहाटेपासून विधिवत पूजा, आरती नंतर या सोहळ्याची सुरुवात झाली. पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, मावळ चे खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, हर्षवर्धन पाटील, सुनेत्रा पवार, आमदार सुनील शेळके, यांच्या उपस्थितीत पूजा संपन्न झाली. वर्षातून एकदा येणाऱ्या या आषाढी वारीसाठी देहू, आळंदीमध्ये हजारो वारकरी दाखल होतात.

# काकांची अजब ‘खेळी’, ’भाकरी’ फिरवली, कन्येला ‘गादी’ दिली, पुतण्याची ’मान’ खाली

## वर्धापन दिनी ‘बॉम्ब’ फोडल्याने राष्ट्रवादीत खळबळ माजली

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

राज्यात राष्ट्रवादी काँग्रेसचा सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिन शनिवारी जल्लोषात साजरा होत असताना पक्षात एकाएकी खळबळ माजली. नवी दिल्लीहून तशी न्यूज थडकली. पक्षाचे संस्थापक शरद पवार यांनी अखेर ‘भाकरी’ फिरवली. आपली एकुलती एक कन्या सुप्रिया सुळे यांना आपला उत्तराधिकारी म्हणून ‘गादी’ दिली. घराणेशाहीचा डाग लागेल या भीतीने पक्षाची एक खुर्ची ज्येष्ठ नेते खा. प्रफुल्ल पटेल यांनाही देवून टाकली. पक्षात दोन कार्याध्यक्षांची निवड जाहीर होताच भर कार्यक्रमात अजितदादा यांनी मान खाली घातली.हा प्रसंग पाहून व्यासपीठावरील काही नेत्यांचा चेहराच पडला. पक्षाच्या स्थापनेपासून हा महाराष्ट्र अजितदादा सांभाळत होते. शरदरावांचे उत्तराधिकारी म्हणून अजितदादांकडेच पाहिले जात होते परंतु कन्याप्रेम शरदरावांच्या आड आल्याचे दिसते. सुप्रियाताईंची कार्याध्यक्षपदी झालेली निवड म्हणजे आता शरदरावांच्या उत्तराधिकारी म्हणून त्यांनाच बहुमान मिळाला, असे मानले जात आहे.





**पहिले आव्हान कोणते? :** 'राष्ट्रवादी काँग्रेसचा राष्ट्रीय पक्षाचा दर्जा गेला आहे. दर्जा जाणं ही काही शोभणारी गोष्ट नाही. याचं आम्हाला दुःख आहे. हा दर्जा पुन्हा मिळवणे हे आपल्यासमोरचे पहिले आव्हान असल्याचे प्रफुल्ल पटेल हे निवडीनंतर पत्रकारांशी बोलताना म्हणाले. ही फक्त माझीच नाही, तर पक्षातील सर्वांचीच जबाबदारी आहे. नागालँडमध्ये आमच्या पक्षाला मान्यता मिळाली आहे. अशा प्रकारे आणखी दोन ते तीन राज्यांमध्ये जास्त आमदार निवडून आणण्याचा प्रयत्न करू आणि त्यासोबत मतांची टक्केवारीही वाढवण्यासाठी काम करू, ही महत्त्वाची बाब असणार आहे. त्या दृष्टीनेच आम्हाला काम करावे लागेल. एक नवीन नेतृत्व भविष्यासाठी तयार करावे, अशी साहेबांची या मागची मानसिकता असावी. साहेबांनी जी काही जबाबदारी दिली आहे, ती पार पाडणे माझ्यासाठी जास्त महत्त्वाचे आहे.

**दादा नाराज नाहीत :** निवडीची घोषणा जाहीर होताच अजितदादा यांनी मान खाली घातली. त्याविषयी मुंबई पत्रकारांनी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना छेडले. त्यावर बोलतना ते म्हणाले, ‘अजित पवार यांच्याकडे महाराष्ट्राच्या विरोधी पक्ष नेतेपदाची मोठी जबाबदारी आहे. दादा नाराज नाहीत. आमच्या पक्षासाठी आज आनंदाचा दिवस आहे. पक्षामध्ये अनेक नेत्यांवर नवी जबाबदारी देण्यात आली आहे. यात अजितदादा कुठेही नाराज नाहीत.

### ‘त्या’ का आल्या नाहीत?

सुप्रियाताई दिल्लीत असतात आणि अजितदादा मुंबईत असतात. पण यावेळी अजितदादा दिल्लीत आहेत आणि सुप्रियाताई या महाराष्ट्रात आहेत. हे जरा वेगळे चित्र दिसले? याकडे लक्ष वेधल्यानंतर पटेल एकदम सावध झाले आणि यावरही प्रफुल्ल पटेल यांनी प्रतिक्रिया दिली. सूचना मिळाली तसे आम्हाला यावे लागते. कारण मी राष्ट्रीय पदाधिकारी आहे. आणि बाकीच्या लोकांनाही निमंत्रण देण्यात आले होते. त्यात अजितदादा, छगन भुजबळ, सुप्रियाताईलापण निमंत्रण होते. पण त्या पुण्यात पक्षाच्या कार्यालयात गेल्या असाव्यात.

### का नेमले दोन कार्याध्यक्ष?

राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकारी अध्यक्षपदी दोघांची निवड का केली?, हा प्रश्न राजकीय पंडितांना पडला आहे. राष्ट्रवादी पक्षाला कार्यकारी अध्यक्ष म्हणून एका नेत्याची निवड करता आली असती मात्र त्यांनी दोघांची निवड केली. दोन कार्यकारी अध्यक्षांची निवड करण्यामागे अनेक कारणे आहेत. राष्ट्रवादीच्या कार्यकारी म्हणून एकट्या सुप्रिया सुळे यांची निवड केली असती तर राजकीय वारसदार म्हणून त्यांना जाहीर केले आहे, असा त्याचा अर्थ निघाला असता. असा कोणताही अर्थ निघू नये यासाठी पवारांनी हा डाव टाकलेला असावा, असे बोलले जात आहे.

पक्षात भाकरी फिरवण्याची चर्चा गेल्या महिन्यांपासून सुरू होती. गेल्याच महिन्यात शरदरावांनी तसे संकेत दिले होते. पण हा बॉम्ब त्यांनी तूर्त झाकून ठेवला होता. राष्ट्रवादीचा वर्धापन दिनाचा मुहूर्त साधून त्यांनी तो अखेर फोडला. पवार यांनी प्रफुल्ल पटेल आणि सुप्रिया सुळे या दोघांची कार्यकारी अध्यक्षपदी निवड केली. आगामी काळातील विचार करता पक्षात बदल करण्यात आल्याचे पवार हे याप्रसंगी बोलताना म्हणाले. यावेळी अजित पवार हे उपस्थित होते. पवार यांच्यानंतर पक्षाची धुरा कुणाकडे जाणार? याची उत्सुकता लागली होती. सुप्रिया सुळे यांच्याकडे महाराष्ट्र, हरयाणाची जबाबदारी देण्यात आली आहे. तर प्रफुल्ल पटेल यांच्याकडे मध्य प्रदेश, गुजरात आणि गोव्याची जबाबदारी देण्यात आली आहे. ही घोषणा होतेवेळी सुप्रिया ह्या महाराष्ट्रातच होत्या. त्यामुळे पवारांच्या या खेळीने सारे नेते अवाक झाले आहेत. पवारांनी त्यांच्या भाषणाच्या शेवटी पक्षात कार्यकारी अध्यक्ष पदी प्रफुल्ल पटेल आणि सुप्रिया सुळे, राष्ट्रीय सरचिटणीस पदी सुनील तटकरे यांची नियुक्ती जाहीर केली. त्यासोबतच जितेंद्र आव्हाड यांनाही ओबीसी विभागाच्या प्रमुख पदाची जबाबदारी दिली. विविध राज्यांमध्ये पक्ष विस्ताराची जबाबदारीही काही नेत्यांवर देण्यात आली आहे. त्यातही अजित पवार यांचे नाव कुठेही नाही. महाराष्ट्रातल्या काही महत्त्वाच्या नेत्यांकडे येत्या काळात महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपवण्यात येण्याची शक्यता आहे. तुरुंगातून बाहेर आल्यापासून अनिल देशमुख अधिक सक्रिय दिसत आहेत. त्यांच्यासोबतच राष्ट्रवादीच्या तगड्या नेत्यांच्या फळीवर नवी जबाबदारी देण्याची तयारी राष्ट्रवादी करत आहे.

चांगल्या नेत्यांची फळी शरद पवारांनी कायम पुढे केली आहे. त्यामुळे हीच रचना पुढच्या काळात कायम राहील अशी व्यवस्था राष्ट्रवादी पक्षाकडून केली जात आहे.

### नो कमेंट्स...

पक्षसंघटनेचा मी मनापासून आभारी आहे. पक्षाने माझ्यावर टाकलेला हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी मी कटिबद्ध आहे, अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी कार्यकारी अध्यक्षपदाच्या निवडीनंतर दिली. पवार यांनी ज्यावेळी सुळे यांच्या नावाची घोषणा केली, त्यावेळी मंचावर बसलेल्या अजित पवार यांची मान खाली होती. पत्रकारांनी त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, मात्र आवाज येत नाही, असे कारण सांगून दादांनी बोलणे टाळले. दादांच्या 'नो कमेंट्स'च्या टायमिंगची चर्चा सगळीकडे झाली.

## म्हैसगाव येथील विठ्ठल कॉर्पोरेशनची ३० लाखांची फसवणूक

### गुजरात येथील एका कंपनीच्या संचालकांच्या विरोधात गुन्हा दाखल

सुराज्य/कुर्डूवाडी

म्हैसगाव (ता. माढा) येथील विठ्ठल कॉर्पोरेशनला गुजरात येथील युनिव्हर्सल कंपनीने शंभर कोटींचे कर्ज देतो म्हणून प्रोसेसिंग फी म्हणून ३० लाख घेऊन फायनान्स कंपनीने फसवणूक केल्यामुळे कंपनीच्या संचालकांच्या विरोधात कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात दि.९ रोजी वैभव वसंत काशीद यांनी फिर्याद दाखल केली आहे. कंपनीच्या संचालकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

युनिव्हर्सल फायनान्स कंपनी वडोदरा गुजरातचे संचालक जिग्नेश प्रविणभाई कुरुंदाळे व संचालक जिग्नेश सोनी व इतर संचालकांनी फसवणूक केली आहे. म्हैसगाव (ता. माढा) येथील विठ्ठल कॉर्पोरेशन नोंदणीकृत कंपनी असून कंपनीचा साखर व उपपदार्थ तयार करून विक्री करण्याचा व्यवसाय आहे. कंपनीस वेळोवेळी व्यापारी व शेतकऱ्यांची देणी देण्यासाठी कर्जाची गरज भासत असते. त्यामुळे कारखाना बँका व खासगी फायनान्स कंपन्या यांच्याकडे कर्जासाठी विचारणा करत असते. विठ्ठल कॉर्पोरेशनने अभिषेक पांडे यांच्यामार्फत युनिव्हर्सल फायनान्स कंपनीचे संचालक जिग्नेश प्रवीणभाई करुंदाळे यांची भेट घेऊन विठ्ठल कॉर्पोरेशनला पैशाची गरज आहे याची माहिती दिली त्यानंतर त्यांनी विठ्ठल कॉर्पोरेशनची संपूर्ण माहिती मागितली आणि विठ्ठल कॉर्पोरेशन कर्जासाठी पात्र असल्याचे पत्र पाठवले.दरम्यान कॉर्पोरेशन कडून १० हजार रुपये व्हिजिट फीच्या स्वरूपात घेऊन युनिव्हर्सल कंपनीचे संचालक जिग्नेश सोनी यांनी १३ डिसेंबर २०२२ साली कारखान्याला भेट दिली.त्यानंतर २८ डिसेंबर २०२२ रोजी जिग्नेश सोनी यांनी विठ्ठल कॉर्पोरेशनकडून कर्जाबाबत सर्व कागदपत्रे लिहून घेतली. त्याच दिवशी पुणे येथे बिचेवार व अभिषेक पांडे यांच्यासमोर १०० कोटी रुपयांच्या ॲग्रीमेंटवर सह्या देखील घेतल्या.त्याच दिवशी विठ्ठल कॉर्पोरेशनकडून प्रोसेसिंग फी व इतर चार्ज म्हणून ३० लाख रुपये भरून घेतले.यानंतर गुजरातच्या युनिव्हर्सल कंपनीने १०० कोटी रुपये विठ्ठल कॉर्पोरेशनच्या खात्यावर वर्ग करण्याचे मान्य केले होते. २७ एप्रिल २०२३ पर्यंत कारखाना खात्यावर कर्जाची रक्कम वर्ग करू अथवा प्रोसेसिंग फी परत करू असे आश्वासन कंपनीच्या संचालकाकडून देण्यात आले होते.

## दुचाकी अपघातात पती-पत्नी ठार

सुराज्य/सांगोला

दुचाकीवरून जात असलेल्या पती-पत्नीस अज्ञात वाहनाची धडक बसल्याने दोघे जण जागीच ठार झाले. हा अपघात शुक्रवारी रात्री ७ च्या सुमारास महुद महीम रस्त्यावरील हनुमान मंदिरानजीक घडला.



ज्ञानेश्वर तुकाराम पाटील (वय ४५), ताई ज्ञानेश्वर पाटील (वय ३८ रा.सोनके, ता.पंढरपूर) अशी अपघातामध्ये ठार झालेल्या पती पत्नीची नावे आहेत. शुक्रवारी सायंकाळी ज्ञानेश्वर पाटील व ताई पाटील हे दुचाकी क्रमांक एमएच १३ - बीएम ९६७५ वरून महीम(ता. सांगोला) येथील नातेवाइकांच्या कार्यक्रमासाठी गेले होते. तेथून कार्यक्रम आटोपून दुचाकीवरून महीमकडून सोनके गावाकडे जात असताना महुदकडून महीमकडे भरधाव जाणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला हनुमान मंदिरानजीक समोरून जोराची धडक दिली. या अपघातामध्ये दोघांचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच पोलीस नाईक चौगुले, विकास क्षीरसागर, पोलीस पाटील प्रभाकर कांबळे, सामाजिक कार्यकर्ते बंटी लवटे यांनी भेट देऊन मदत केली.

## देवाचा प्रसाद देतो म्हणून पंढरपुरात महिलेचे दागिने पळविले

सुराज्य/सांगोला

देवाचा प्रसाद देतो म्हणून एका ६० वर्षीय महिलेचे ३० हजाराचे दागिने घेऊन दोघा भामट्यांनी पोबारा केला. ही घटना शुक्रवारी सकाळच्या सुमारास पंढरपूर येथील इंदिरा गांधी भाजी मंडई जवळ घडली. यासंदर्भात अरुणा गणपत शिंदे (वय ६० रा.भाजी मंडई चौक) यांनी पंढरपूर शहर पोलिसात फिर्याद दाखल केली. त्या काल सकाळी भाजी मंडळीतून पायी निघाल्या होत्या.

त्यावेळी दोघा भामट्यांनी त्यांना देवाच्या प्रसाद देतो म्हणून त्यांना दुकानाजवळ बसण्यास सांगितले. त्यानंतर त्यांनी गर्दीत चोऱ्या-माऱ्या होतात दागिने अंगावर घालून फिरत जाऊ नका. ते पिशवी ठेवा असे सांगितले. त्याप्रमाणे अरुणा शिंदे यांनी गळ्यातील सोन्याची मोहनमाळ काढून पिशवीत ठेवली. यावेळी भामट्याने हात चलाखी करीत दागिने घेऊन पसार झाले. या प्रकरणात पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. सहाय्यक फौजदार गोसावी पुढील तपास करीत आहेत.

## कटफळ येथील पेट्रोल पंपावर मारहाण; कामगार जखमी, ७ जणांविरुद्ध गुन्हा

सुराज्य/सोलापूर

वाहनात इंधन भरताना डिझेल सांडल्याच्या कारणावरून लाकडी दांडगे आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत कामगार जखमी झाला. ही घटना कटफळ (ता.सांगोला) येथील हिंदकेसरी पेट्रोल पंपाच्या आवारात गुरुवारी रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणात सांगोल्याच्या पोलिसांनी ७ जणांविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे.

यासंदर्भात विक्रांत संतोष विटकर (वय १८ रा.कटफळ) या जखमीने सांगोला पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी दत्ता संजय माने, मयूर नरळे,



प्रवीण बाड, साहील सरतापे, शिवराज मंडले, ओंकार कांबळे आणि धनाजी चव्हाण (सर्व रा.महूद ता.सांगोला) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. ते सर्वजण गुरुवारी रात्री दहा वाजेच्या सुमारास एमएच ४५-एम-५४१५ या वाहनात डिझेल भरण्यासाठी आले होते. डिझेल भरताना त्यातील काही डिझेल खाली सांडल्याच्या कारणावरून वरील आरोपींनी त्याला ठार मारण्याची धमकी देऊन मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार क्षीरसागर पुढील तपास करीत आहेत.

## पोहायला गेलेल्या तरुणाचा तळ्यात बुडून मृत्यू

सुराज्य/मोहोळ

तळ्यात पोहायला गेलेल्या तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना शनिवारी रोजी दुपारी तीन वाजताच्या सुमारास शिरापुर (सो) येथे घडली.




याबाबत पोलिसांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार, मोहोळ तालुक्यातील शिरापुर सो येथील शत्रुघ्न वामन धोत्रे हे कुटुंबासमवेत राहतात. गेल्या वर्षभरापासून त्यांचा मेव्हणा ओंकार अनंत रणसुभे हा आई वडिलांचा मृत्यू झाल्याने यांच्याकडेच रहायला होता. तो गावातीलच स्पेनका नामक पाण्याच्या कंपनीत काम करीत होता. दरम्यान दि. १० जून रोजी ओंकार याने कामावरून सुट्टी घेतली होती. तो नेहमीप्रमाणे गावालगत असलेल्या तळ्यात पोहायला तसेच मासे पकडण्यासाठी गेला होता. दुपारी तीन वाजताच्या सुमारास शत्रुघ्न धोत्रे यांच्या कामगाराने फोन करून सांगितले की, पोहायला गेलेल्या ओंकार चे कपडे वर दिसत असून तो मात्र दिसून येत नाही, तुम्ही येऊन बघा असे सांगितल्याने धोत्रे यांनी तात्काळ तळ्याकडे धाव घेतली असता ओंकार चे कपडे तळ्याच्या कडेला दिसले.

मात्र तो न दिसल्याने त्यांनी इतर लोकांच्या मदतीने तळ्यात उतरून शोध घेतला असता तो पाण्यात बुडालेल्या अवस्थेत आढळला. त्याला तात्काळ बाहेर काढून मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी उपचारापूर्वी तो मयत झाल्याचे सांगितले असल्याची शत्रुघ्न धोत्रे यांनी खबर दिली असून यानुसार मोहोळ पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## कात्राळ येथे ६० हजारांचे दागिने पळविले

सुराज्य/सोलापूर

कात्राळ (ता.मंगळवेढा) येथे राहणाऱ्या रजाक इमाम नदाफ यांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने कपाटातील ६० हजार रुपये किमतीचे दागिने पळविले.



ही घरफोडी ६ जून रोजी सकाळच्या सुमारास घडली. नदाफ हे घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. त्यावेळी चोरट्याने कुलूप तोडून घरात प्रवेश केला. आणि कपाटातील १५ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरून नेले. दुपारी हा प्रकार उघडकीस आला. अशी नोंद मंगळवेढा पोलिसात झाली. हवालदार बोराडे पुढील तपास करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



पाण्याची बाटली आणली का?

कल्याण

237-29-270

## तुळजाभवानी देवीच्या दानपेटीत आढळले ३५४ हिरे; किंमत ४ कोटींच्या घरात

सुराज्य/तुळजापूर

महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी माता मंदिरातील दागिन्यांच्या मोजमापाला सुरुवात झाली आहे. त्यात ३५४ हिरे सापडल्याने आश्चर्याचा धक्का बसला आहे. तुळजाभवानी देवीच्या तिजोरीतील सोने-चांदीचे गेल्या २ दिवसांपासून मोजमाप सुरू आहे.

तब्बल १५ वर्षांनंतर भाविकांनी तुळजा भवानी देवीला अर्पण केलेल्या दागिन्यांचे मोजमाप सुरू आहे. दरम्यान, या ऐवजाच्या मोजमापादरम्यान एक आश्चर्यकारक घटना घडली. दागिन्यांचे मोजमाप सुरू असताना ३५४ हिरे भक्ताने दान केल्याचे समोर आले. या ३५४ हिऱ्यांची किंमत अंदाजे ३० ते ४० कोटी असल्याचं सांगण्यात येत आहे. परंतु, इतक्या प्रमाणात हिरे एका भाविकाने दान केले की अनेक भाविकांनी याची माहिती अद्याप समोर आली नाही.

तुळजाभवानी मंदिरात दान अर्पण करण्याची एक पद्धत आहे. भाविक एका पाकिटामध्ये बंद करून सोने-चांदीचे दागिने किंवा हिरे दानपेटीत टाकतात, त्यामुळे हे हिरे एकाच भाविकाने दिली



किंवा नेमके किती भाविकांनी दिले, याचा आकडा अद्याप समोर आला नाही. एवढ्या प्रमाणात देवीच्या दानपेटीत हिरे सापडणे सर्वांना आश्चर्यचकित करून टाकणारे आहे, कारण याआधी तिरुपती मंदिर, शिर्डीचे साईबाबा मंदिर आणि सिद्धीविनायकला इतक्या प्रमाणात दान केलेले आपण पाहिले असेल, पण तुळजाभवानी मंदिरात इतक्या प्रमाणात हिऱ्यांची दान करण्याची ची ही पहिलीच घटना असल्याचे सांगण्यात येते.

हे निदर्शनास आलेले ३५४ हिरे आकाराने छोटे असले तरी त्यांचे मूल्य अंदाज ३० ते ४० कोटी असल्याचे सांगण्यात येत असल्याने हे आणखी आश्चर्यकारक आहे. हे दान नेमके केले कोणी? याची माहिती समोर आली नाही. कदाचित सीलबंद पाकिटात भाविकाने दान केल्याने हे नजरेत आले नसावे किंवा पाकीट सीलबंद असल्याने दानाची नोंद देखील करण्यात आला नसावी. तुळजाभवानी देवीला नवसपूर्ती म्हणून अनेक भाविक सोने-चांदीच्या स्वरूपात दान अर्पण करतात. १५ वर्षानंतर सुरू करण्यात आलेली तिजोरीतील दान केलेल्या ऐवजाची मोजणी अजून महिनाभर चालणार आहे. आगामी एक महिन्यात जवळपास २०० किलो सोने आणि ४ हजार किलो चांदीचे मोजमाप करण्यात येणार असल्याचा प्राथमिक अंदाज आहे, त्यानंतर त्यांची शुद्धता तपासणी होणार आहे.



## भंडारकवठे येथे साने गुरुजी कथामालेतर्फे वडाच्या रोपांचे रोपण

**सोलापूर** : येथील अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला, जिल्हा समिती आणि वृत्तपत्र लेखक मंच, सोलापूरच्या संयुक्त विद्यमाने भंडारकवठे येथे विजय बिज्जरगींच्या शेतात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वडाचे व इतरही झाडे लावून वृक्षारोपण करण्यात आले. अध्यक्ष अशोक खानापुरे यांच्या नियोजनात झालेल्या कार्यक्रमात कार्यवाह रामचंद्र धर्मसाले यांनी स्वागत करुन प्रास्ताविक केले. मल्लिनाथ किणगी यांनी साने गुरुजींची प्रार्थना म्हटली. प्रांजली मोहिकर व धर्मसाले यांचे बहारदार काव्यवाचन केले. श्रीमंत बनसोडे, रंगसिद्ध कोरे, ज्योती मेने, श्रीवल्लभ करकंबकर, प्रेमचंद मेने, उपाध्यक्षा आरती काळे, वृत्तपत्र लेखक मंचचे अध्यक्ष सुनील पुजारी यांनी पर्यावरणाचे विशद केले. दोन्ही संघटनांच्या अध्यक्षांच्या हस्ते विजय बिज्जरगी यांचा बसवरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कोषाध्यक्ष अशोक म्हमाणे यांनी आभार मानले. मनोगत व्यक्त केले व काव्यवाचक यांच्यासह वृत्तपत्र लेखक मंचचे कार्यवाह अरुणकुमार धुमाळ, भंडारकवठे येथील पतसंस्थेचे गजानन व सिद्धाराम बुगडे, नागेश माळगे इ. निसर्गप्रेमी उपस्थित होते. सिद्राम हंगरगी यांनी कथामालेला रोपे भेट दिल्याबद्दल व विजय बिज्जरगी यांनी सर्वतोपरी सहकार्य केल्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानले.



## रिपाइंच्या वतीने भालचंद्र साखरे यांचा सत्कार

**सोलापूर** : मुंबई येथील भगवा फौंडेशनच्या वतीने लोकमाता अहिल्यामाई राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाकडील कर्मचारी भालचंद्र साखरे यांचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) यांच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष सुबोध वाघमोडे यांच्या हस्ते पुरस्कार प्राप्त भालचंद्र साखरे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी आपल्या भाषणात प्रदेशाध्यक्ष वाघमोडे यांनी साखरे यांच्या कार्याचा गुणगौरव केला. याप्रसंगी कामगार नेते चांगदेव सोनवणे, श्रीनिवास रामगल, जक्कप्पा कांबळे, रफिक शेख, नसरीन शेख, अविना शेख, पुनम मोरे, अरुणा सरवदे, मारुती सोनवणे, समीर मुजावर, दीपक शिंदे माने आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**IND vs AUS, WTC 2023 Final**

# कोहली-रहाणेवर भारताची मदार, फायनल सामना जिंकण्यासाठी भारताला २८० धावांची आवश्यकता

**ओव्हल/वृत्तसंस्था**

**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा फायनलचा सामना लंडनच्या ओव्हल मैदानात रंगत आहे. पहिल्या डावात ऑस्ट्रेलियाने सर्वबाद ४६९ धावा कुटल्या होत्या. त्यानंतर प्रत्युत्तरात भारताने सर्वबाद २९६ धावा केल्या होत्या. त्यानंतर आज चौथ्या दिवशी ऑस्ट्रेलियाने त्यांची इनिंग घोषीत केलीय. ऑस्ट्रेलियाने ८४.३ षटकांमध्ये ८ विकेट्स गमावत २७० धावांपर्यंत मजल मारली. त्यामुळे ऑस्ट्रेलियाने ४४३ धावांची आघाडी घेतली असून भारताल वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची फायनल जिंकण्यासाठी ४४४ धावांचं तगडं लक्ष्य गाठावं लागणार आहे. या धावांचा पाठलाग करताना भारताची सुरुवात चांगली झाली होती. शुबमन गिल १८ धावांवर बाद झाल्यानंतर कर्णधार रोहित शर्मा आणि चेतेश्वर पुजाराने कमान सांभाळली होती.**




मात्र, नेथन लायनने कर्णधार रोहित शर्माला ४३ धावांवर आणि पॅट कमिन्सने चेतेश्वर पुजाराला २७ धावांवर बाद करून भारताला तिसरा धक्का दिला. पण त्यानंतर विराट कोहली आणि अजिंक्य रहाणेनं अप्रतिम फलंदाजी करून भागिदारी केली. विराट कोहली ६० चेंडूत ४४ तर अजिंक्य रहाणे ५९ चेंडूत २० धावांवर नाबाद राहिला आहे. चौथ्या दिवसाचा खेळ संपला असून ४० षटकांमध्ये भारताने ३ विकेट्स गमावत १६४ धावा केल्या आहेत. त्यामुळे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची फायनल जिंकण्यासाठी भारताला अजूनही २८० धावांची आवश्यकता आहे. उद्या रविवारी शेवटचा दिवस असून भारत २८० धावा करून ४४४ धावांचं लक्ष्य गाठतो का? हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

**शुबमन गिलची विकेट संशयास्पद :** भारताचे सलामीवर फलंदाज कर्णधार रोहित शर्मा आणि शुबमन गिल कांगारुंचा समाचार घेण्यासाठी मैदानात उतरले आणि भारताला चांगली सुरुवात करून दिली. मात्र, स्कॉट बोलँडच्या गोलंदाजीवर शुबमन १८ धावांवर खेळत असताना त्याने स्लिपमध्ये चेंडू मारला आणि कॅमरून ग्रीनने झेल पकडला. मात्र, झेल पकडल्यानंतर चेंडू जमिनीला लागल्याचं व्हिडीओत पाहायला मिळालं. तसंच आधुनिक तंत्रज्ञान असतानाही थर्ड अंपायरने व्हिडीओ झूम आणि फ्रिझ केला नाही. त्यामुळे टीम इंडियाच्या चाहत्यांसह समालोचकांनी नाराजी व्यक्त केली. गिलला अंपायरने बाद दिल्यानंतर रोहित शर्माने अंपायरशी चर्चा केली. परंतु, त्यानंतरही गिलला बाद देण्यात आलं आण टीम इंडियाला पहिला धक्का बसला.

लर्ड टेस्ट चॅम्पियनशीपच्या फायनलमध्ये ऑस्ट्रेलियाने पकड मजबूत केली आहे. ऑस्ट्रेलियाने दुसरा डाव २%० धावांवर घोषित केला. पहिल्या डावातील १%३ धावांच्या आघाडीच्या बळावर ऑस्ट्रेलियाने भारताला विजयासाठी ४४४ धावांचे आव्हान दिले. दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलियाकडून अॅलेक्स कॅरी याने सर्वाधिक ६६ धावांचे योगदान दिले. टीम इंडियाकडून रविंद्र जाडेजा याने सर्वाधिक तीन विकेट घेतल्या. चौथ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात झाल्यानंतर उमेश यादव याने ऑस्ट्रेलियाला पहिला धक्का. मार्नस लाबुशेन याला त्याने तंबूत धाडले. लाबूशन याने ४१ धावांचे योगदान दिले. लाबुशेन बाद झाल्यानंतर कॅमरुन ग्रीन आणि अॅलेक्स कॅरी यांनी डाव सावरला. दोघांनी दमदार फलंदाजी केली. रविंद्र जाडेजाने ग्रीन याला तंबूत पाठवत भारताला मोठे यश मिळून दिले. पण त्यानंतर कॅरी आणि स्टार्क यांनी भारताची डोकेदुखी वाढवली.

कॅरी याने अर्धशतकी खेळी केली. मिचेल स्टार्क ४१ धावांवर शमीचा शिकार ठरला. पॅट कमिन्स पाच धावांवर बाद झाला. कर्णधार कमिन्स याने ऑस्ट्रेलियाचा डाव घोषित केला. ऑस्ट्रेलियाकडून सर्वाधिक धावा कॅरी याने चोपल्या. अॅलेक्स कॅरी याने ६६ धावांची खेळी केली.

## गोव्यात वैश्विक हिंदू राष्ट्र महोत्सवाचे आयोजन

**सोलापूर** : हिंदू राष्ट्र स्थापनेच्या कार्याला गती देण्यासाठी दरवर्षीप्रमाणे दि. १६ ते २२ जून या कालावधीत 'श्री रामनाथ देवस्थान', गोवा येथे अखिल भारतीय हिंदू राष्ट्र अधिवेशन अर्थात वैश्विक हिंदू राष्ट्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती हिंदू जनजागृती समितीचे राजन बुणगे यांनी पत्रकार परिषदेत दिली. मागील ११ वर्षापासून होणाऱ्या अखिल भारतीय हिंदू राष्ट्र अधिवेशनामुळे हिंदु राष्ट्राची चर्चा केवळ भारतातच नाही तर वैश्विक पातळीवर झाली आहे.

यामध्ये आता हिंदु राष्ट्राची मागणी करणारी अनेक व्यासपीठे निर्माण झाले आहेत. यंदाच्या अधिवेशनात 'हिंदुराष्ट्र संसद' या वैशिष्ट्यपूर्ण सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. विविध विषयावरील तज्ञ मंडळींचे परिसंवाद तसेच विशेष कार्य करणाऱ्या मान्यवरांच्या मुलाखती यंदाच्या अधिवेशनाचे आकर्षण असणार आहे. लव्ह जिहाद, हलाल सर्टिफिकेशन, लँड जिहाद, काशी-मथुरा मुक्ती, धर्मांतर, गोहत्या, गड किल्ल्यावरील इस्लामी अतिक्रमणे, मंदिर संस्कृतीचे रक्षण, काश्मिरी हिंदूंचे पुनर्वसन, पाकिस्तान आणि बांगलादेश येथील हिंदू वरील अत्याचार यासारख्या विविध विषयांसोबतच हिंदू राष्ट्राच्या पायाभरणीसाठी आवश्यक विषयांवर या महोत्सवांमध्ये विचारमंथन केले जाणार असल्याचे बुणगे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस प्रज्ञापुरी ज्ञानपीठ अक्कलकोट अध्यक्ष प्रसाद पंडित, हिंदू जनजागृती समितीचे अधिवक्ता संघटक निलेश सांगोलकर आणि सनातन संस्थेचे हिरालाल तिवारी आदी उपस्थित होते.



माजी शिक्षणाधिकारी विद्याधर जगताप यांचा वाढदिवसानिमित्त हर्षवर्धन हायस्कूलच्यावतीने मुख्याध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवतीने सपत्निक सत्कार करण्यात आला.



## सनी देओलची खास झलक; गदर २ चा टीझर प्रदर्शित

**सुराज्य/मुंबई**

'गदर २' हा चित्रपट गेले अनेक महिने चर्चेत आहे. या चित्रपटाबद्दल अनेक अपडेट्स समोर येत होते. याचबरोबर या चित्रपटाच्या शूटिंग दरम्यानचे काही व्हिडीओ आणि फोटोही व्हायरल झाले होते. या सगळ्यामुळे या चित्रपटाबद्दलची प्रेक्षकांची उत्सुकता आणखीन वाढली होती. त्यामुळे या चित्रपटाची पहिली झलक पाहण्यासाठी प्रेक्षक आतुर होते.

तर आता निर्मात्यांनी या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित केला आहे. परंतु हा टीझर कोणत्याही सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अपलोड करण्यात आलेला नाही. तर हा टीझर पाहण्यासाठी प्रेक्षकांना चित्रपटगृहात जावं लागणार आहे. नुकताच गदर: एक प्रेम कथा' हा चित्रपट पुन्हा एकदा चित्रपटगृहात प्रदर्शित करण्यात आला. जे प्रेक्षक हा चित्रपट चित्रपटगृहात पाहतील त्यांना गदर २'चा टीझर पाहायला मिळणार आहे. या टीझरच्या सुरुवातीला सनी देओलचा परिचय करून देणारा एक संवाद आहे, ज्यामध्ये एक महिला म्हणते की, तो पाकिस्तानचा जावई आहे, त्याला नारळ द्या, टीळा लावा, अन्यथा तो हुंड्यासाठी लाहोरला घेऊन जाईल. लोकांना हा संवाद इतका आवडला आहे की चित्रपटगृहांमध्ये टीझर रिलीज झाला असला तरी हा डायलॉग सोशल मीडियावर ट्रेंड करू लागला आहे. तर काही दिवसांनी हा टीझर यूट्यूबवर प्रदर्शित केला जाईल असं सांगितलं जात आहे. हा चित्रपट ११ ऑगस्ट रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होईल.

## टीडीएम चित्रपटाला राज्यात अजूनही प्राईम टाईम शो नाही

**सुराज्य/मुंबई**




भाऊराव कऱ्हाडे दिग्दर्शित टीडीएम' हा चित्रपट २८ एप्रिल रोजी प्रदर्शित झाला. राज्यात ज्या ज्या थिएटर्समध्ये चित्रपट प्रदर्शित झाला, तिथे त्याला चांगलं ओपनिंग मिळालं. पण, बऱ्याच ठिकाणी टीडीएम'चे शो कॅन्सल केले गेले, तसेच चित्रपटाला प्राईम टाईम मिळत नसल्याचं दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे व टीमने याविरोधात आवाज उठवायला सुरुवात केली. एका चित्रपटगृहात याबद्दल बोलताना यातील कलाकारांच्या डोळ्यात अश्रू तरळले.

तो व्हिडिओदेखील सोशल मीडियावर व्हायरल झाला. यानंतर ठीकठिकाणी या चित्रपटाची चर्चा व्हायला सुरुवात झाली. सोशल मीडियावर तर बऱ्याच लोकांनी या चित्रपटाला पाठिंबा दर्शवला. पण या सगळ्या गोष्टींमुळे भाऊराव कऱ्हाडे यांनीच हा चित्रपट चित्रपटगृहातून काढून घ्यायचा निर्णय घेतला. आता त्यानंतर ९ जूनला हा चित्रपट पुन्हा संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित करण्यात आला आहे. तरी अजून परिस्थिती जैसे थेच आहे. अद्याप चित्रपटाला प्राइम टाइम म्हणजेच संध्याकाळ आणि रात्रीचे शोज मिळालेले नाहीत. नुकतंच कर्जत जामखेडचे आमदार आणि शरद पवार यांचे नातू रोहित पवार यांनी या चित्रपटाच्या समर्थनार्थ एक पोस्ट शेअर करत या चित्रपटाला प्राइम टाइम मिळावा अशी विनंती केली आहे. चित्रक्षा निर्मिती'ने त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवर रोहित पवार यांची ही पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये ते म्हणतात, मराठी कलाकार जिद्दी, कष्टाळू आहे, तो व्यवस्थेसमोर झुकत नाही, तो विनम्र होतो केवळ प्रेक्षकांसमोर. यावेळी ढ्ञ्च' या चित्रपटाला प्राइम टाइम शो देऊन चित्रपटगृहाच्या मालकांनी सहकार्य करायला हवं.

## संत निरंकारी मंडळातर्फे आज रक्तदान शिबिर

**सुराज्य/सोलापूर**



प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी मानव कल्याणार्थ संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनच्या माध्यमातून भारतवर्षातील मिशनच्या बहुसंख्य शाखांसह संत निरंकारी सत्संग भवन, अंत्रोळीकर नगर भाग एक, कुमठा नाका, सोलापूर येथे रविवार ११ जून रोजी सकाळी ९ ते ४ या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये मिशनचे अनुयायांसह भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने स्वेच्छेने व उत्स्फूर्तपणे रक्तदानाच्या पवित्र कार्यात सहभागी होऊन सद्गुरुचा आशीर्वाद प्राप्त करावा, असे आवाहन सोलापूर क्षेत्राचे क्षेत्रिय प्रभारी इंद्रपालसिंह नागपाल यांनी केले आहे.

## ओव्हलवर मराठीचा गजर! रहाणे-शार्दूलचा मराठीतून संवाद



**ओव्हल** : अजिंक्य रहाणे आणि शार्दूल ठाकूर या मराठमोळ्या खेळाडूंनी आक्रमक फलंदाजी करत भारताच्या डावाला आकार दिला. शार्दूल-रहाणे या जोडीने फलंदाजी करताना आपली वेगळी छाप सोडली. याचे कारण म्हणजे खेळपट्टीवर असताना एकमेकांना प्रोत्साहन देत दोघेही मराठीमध्ये संवाद साधत होते. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झालाय.

शार्दूल आणि अजिंक्य रहाणे यांच्या दमदार फलंदाजीने सर्वांची मने जिंकली. फलंदाजी करताना दोघांनी खेळपट्टीवर मराठीतून संवाद साधत प्रतिस्पर्धी खेळाडूंना रणनितीपासून दूर ठेवले. रहाणे शार्दुलला मराठीमधून सूचना देत होता. रहाणे म्हणाला की, खेळत रहा खेळत रहा शाब्बास, एक एक बॉलचा विचार कर फक्त, चांगलं आहे खेळत रहा. त्यावर शार्दुल रहाणेला म्हणतो, पॉइंट मागे केला हा. मराठीतून बोलतानाचा त्यांचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झालाय. लॉर्ड शार्दूल ठाकूर आणि अजिंक्य रहाणे यांनी खडूस फलंदाजी करत ऑस्ट्रेलियाच्या मनसुब्यावर पाणी फेरले. ६ बाद १५२ अशी दयनीय अवस्था टीम इंडियाची झाली होती. त्यावेळी मुंबईकर अजिंक्य रहाणे आणि शार्दूल ठाकूर ऑस्ट्रेलियाला नडले.. मोक्याच्या क्षणी दोघांनी शतकी भागिदारी केली. १४५ चेंडूत १०९ धावांची भागिदारी करत ऑस्ट्रेलियाच्या मनसुब्यावर पाणी फेरले. शार्दूल आणि अजिंक्य रहाणे यांच्या भागिदारीमुळे टीम इंडियावरील फॉलोऑनचे संकट टाळले. अजिंक्य रहाणे याने तब्बल १८ महिन्यानंतर कसोटीत कमबॅक केलेय. आघाडीचे फलंदाज बाद झाल्यानंतर रहाणे एखाद्या योद्ध्याप्रमाणे लढला. जाडेजासोबत अजिंक्य रहाणे याने ७१ धावांची भागिदारी केली.



## चॅम्पियन लीग फुटबॉल: जेतेपदासाठी मँचेस्टर सिटी-इंटर मिलानमध्ये द्वंद्व

**इस्तंबूल** : चॅम्पियन्स लीग फुटबॉलच्या अंतिम सामन्यात शनिवारी मँचेस्टर सिटी व इंटर मिलान हे संघ एकमेकांसमोर असतील, तेव्हा दोन्ही संघांचा प्रयत्न विजेतेपद मिळवण्याचा असेल. सिटीने गेल्या तीन वर्षांत दुसऱ्यांदा अंतिम फेरीत प्रवेश मिळवला आहे, तर इंटर मिलानचा हा पाचवा अंतिम सामना असेल. त्यामुळे दोन्ही संघांमध्ये चांगली चुरस पाहायला मिळेल.

तीन जेतेपदे मिळवणाऱ्या इंटर मिलानचा प्रयत्न या वेळीही अजिंक्यपद मिळवण्याचा असणार आहे. सध्याचे संघाचे प्रशिक्षक सिमोन इंझागी यांच्या मार्गदर्शनाखाली संघ पहिल्यांदा अंतिम सामना खेळेल. इंटरने कठीण गटातून इथवर वाटचाल केल्याने त्यांचा आत्मविश्वास दुणावला असेल. मँचेस्टर सिटीने या सामन्यात विजय मिळवल्यास ते मँचेस्टर युनायटेडच्या विक्रमाशी बरोबरी साधतील.

एकाच हंगामात प्रीमियर लीग, एफए चषक आणि चॅम्पियन्स लीग जिंकणारा सिटी हा युनायटेडनंतरचा पहिला संघ ठरेल. चॅम्पियन्स लीगची कार्यक्रमपत्रिका जाहीर झाली तेव्हा इंटरला सर्वात कठीण गट मिळाला होता. बायर्न म्युनिक, बार्सिलोना आणि इंटर संघांनी मिळून एकूण १४ जेतेपदे मिळवली होती. सुरुवातीच्या सामन्यांतील चांगल्या कामगिरीनंतर इंटरने लीगच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

## जोकोव्हिच सातव्यांदा अंतिम फेरीत

**स्पेनच्या कार्लोस अल्कराझचा केला पराभव...**



**पॅरीस** : सर्बियाच्या नोव्हाक जोकोव्हिचने पायाच्या दुखापतीने त्रस्त झालेल्या स्पेनच्या कार्लोस अल्कराझचा ६-३, ५-७, ६-१, ६-१ असा पराभव करून सातव्यांदा फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. वयाच्या ३६व्या वर्षी या स्पर्धेची अंतिम फेरी गाठणारा जोकोव्हिच १९२५ पासून केवळ दुसराच टेनिसपटू ठरला.

जोकोव्हिचने पहिल्या सेटपासून आपल्या खेळातील आक्रमकता दाखवली. पहिला सेट जोकोव्हिचने अगदी सहज जिंकला. पण, जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी असलेल्या अल्कराझने दुसऱ्या सेटमध्ये कमालीची लढाऊ वृत्ती दाखवत अगदी अखेरच्या क्षणी दुसरा सेट जिंकून बरोबरी साधली. तिसऱ्या सेटपासून अल्कराझला पायात वेदना जाणवू लागल्या. त्याच्या हालचाली आणि फटक्यातील वेग मंदावला होता. याचा फायदा घेत जोकोव्हिचने तिसरा आणि चौथा सेट अगदी सहज जिंकून विजयावर शिक्कामोर्तब केले.

कारकीर्दीत जोकोव्हिच आणि अल्कारझ दुसऱ्यांदाच, तर ग्रँडस्लॅम स्पर्धेत प्रथमच समोरासमोर आले होते. जोकोव्हिचला आता ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेचे ऐतिहासिक विजेतेपद निश्चितपणे खुणावत असेल. आतापर्यंत त्याने २२ ग्रँडस्लॅम विजेतेपद मिळवली आहे.इतक्या सर्वोच्च स्तरावर खेळताना तंदुरुस्ती राखणे सर्वात महत्त्वाचे असते.

**महाराष्ट्र प्रिमियर लीग स्पर्धा**

## चमिंडा वास सोलापूर रॉयल संघाचा मुख्य प्रशिक्षक

**सोलापूर** : महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या महाराष्ट्र प्रिमियर लीग स्पर्धेला १५ जूनपासून शुभारंभ होत आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात लिलाव प्रक्रिया पार पडली. पुणे, सोलापूरसह सहा संघामध्ये ही स्पर्धा रंगणार आहे. सोलापूर रॉयल्स संघाने आपले मुख्य प्रशिक्षक म्हणून श्रीलंकेचा महान वेगवान गोलंदाज चमिंडा वास यांची नियुक्ती केली आहे. सोलापूर रॉयल्स आणि चामिंडा वास यांनी सोशल मीडियावर याबाबतची माहिती दिली. सोलापूर संघाला आयपीएलमधील राजस्थान रॉयल्स संघाचे पाठबळ आहे.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# तलावातून गाळ काढण्याची योजना शेतजमिनीला संजीवनी देणारी : आ. देशमुख

✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर

**शेतकऱ्यांच्या नापीक जमिनी सुपीक करणारी गाळ काढण्याची योजना आहे, जरी पावसाळ्याच्या तोंडावर याचे काम सुरू झाले असले तरी प्रतिसाद चांगला आहे. ही योजना शेतकऱ्यांच्या हिताची असून शेतजमिनीला नवी संजीवनी देणारी आहे. प्रत्येक जिल्ह्यात शासकीय यंत्रणे कडून धरण अथवा तलावातील गाळ काढण्याचे काम हाती घेण्यात आले आहे, असे प्रतिपादन आमदार सुभाष देशमुख यांनी केले.**

सरकारची महत्त्वाकांक्षी व शेतकऱ्यांना संजीवनी देणारी गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार २.० या योजनेचा शुभारंभ राज्यभरात झालेला आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्वात मोठा मानला जात असलेला एकरूख तलावामध्ये गाळ काढण्यास सुरुवात झाली आहे. त्या ठिकाणी आमदार सुभाष देशमुख यांनी शनिवारी भेट दिली. यावेळी उपजिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, तहसीलदार सैफन नदाफ, जलसंधारण विभागाचे उप अभियंता व्ही एन होनमुटे, प्रल्हाद कांबळे यांनी भेट देत, सर्वत्र पाहणी केली.

या तलावातून दिवस रात्र गाळ काढला जात असून सुमारे २ पोकलन ४ जेसीबी, २० ट्रॅक्टर, २५ हायवाच्या माध्यमातून दिवसाला साडेतीन हजार घनमीटर गाळ उपसा केला जात आह. यावेळी परिसरातील दत्तात्रय खंडागळे, नंदकुमार खंडागळे, दाजी कोले, मनोज गुंड, सुरेश डांगे, उत्तम शिंदे, दिगंबर मिसाळ, सचिन शिंदे, तुकाराम शिंदे, बळीराम कादे हे शेतकरी उपस्थित होते.



यावेळी आमदार देशमुख यांनी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांचा सत्कार करत होते पण ठोंबरे यांनी तो नाकारला तेव्हा आ.देशमुख यांनी कल्पना सुचवली की आपण एक जेसीबी चालक एक डंपर चालक आणि एक गाळ नेणारा शेतकरी यांचा सत्कार करू तेव्हाही संकल्पना सर्वांनाच आवडली आणि येथे उपस्थित या तिघांचा सत्कार करण्यात आला.

जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी सांगितले, गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार या योजनेला शेतकऱ्यांचा सोलापूर जिल्ह्यातून चांगला प्रतिसाद मिळतो आहे. जिल्ह्यात ९९ ठिकाणी गाळ काढण्यासाठी कामे अंतिम केले असून त्यापैकी २५ कामे हाती घेण्यात आले आहेत. आजपर्यंत १.५० लक्ष टीसीएम गाळ काढण्यात आला आहे. ७५ हेक्टर क्षेत्र सुपीक केले असून शासनाच्या धोरणानुसार विधवा, माजी सैनिक, अल्पभूधारक यांना हेक्टरी ३७ हजार ५०० रुपये गाळ वाहून नेण्याचे अनुदान देण्यात येते. शेतकऱ्यांची अनुदान वाढीव मागणी आहे परंतु शासनाच्या धोरणानुसार राबवली जाईल असे त्यांनी सांगितले.



## वैभव शहा, विराग गांधी यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार

✔ **नातेपुते** : आंतरराष्टीय मानवाधिकार नियंत्रक परीषदेमार्फत देण्यात येणारा राष्ट्रीय पुरस्कार यावर्षी नातेपुते येथील वैभव शहा व वैराग येथील विराग गांधी यांना देण्यात आला. कार्यक्रम पंजाब (अमृतसर) येथे हॉटेल कोर्टयार्ड न्याय मेरीड येथे घेण्यात आला असून खा. जयाप्रदा याच्या हस्ते व वी.पी.सींग, सर्वेश पाटक, आकांक्षा विद्यार्थी, रोहित जैन या मान्यवरांच्या उपस्थित वैभव शहा व विराग गांधी यांना राष्टीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

नातेपुते तालुका माळशिरस येथील वैभव शहा हे विराग विकसंत समिती राजस्थान या समीतीमार्फत गोरगरीब कॅन्सर,मोतीबिंदू,यांची शिबीर घेऊन सामाजिक काम करतात,तसेच रत्नत्रय इंग्लीश मिडियम स्कूलच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांसाठी दत्तक योजना राबवल्या, वृक्षारोपण संगोपण,राजस्थान येथे ८०० झाडे लावून त्यांचे संगोपण केले आहे, या सर्व कामकाजाची दखल घेऊन वैभव शहा यांना हा पुरस्कार देण्यात आला.वैभव शहा यांना हा पुरस्कार मिळाल्याने त्याचे नातेपुते परीसरात कौतूक होत आहे.

## एसपीएम पॉलिटेक्निकमध्ये डिप्लोमा प्रवेश प्रक्रिया सुरू

✔ **सोलापूर** : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता पदविका अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया सुरुवात झाली आहे. इयत्ता दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमासाठी ऑनलाइन पोर्टलद्वारे सहभागी होता येणार आहे.

प्रथम वर्षासाठी ऑनलाइन नोंदणी १ जून रोजी सुरुवात झाली असून २१ जून २०२३ पर्यंत ऑनलाइन अर्ज नोंदणी, स्कॅन छायाप्रती अपलोड करणे, अर्जाची छाननी इ. करता येणार आहे. रौप्य महोत्सवाकडे यशस्वीपणे वाटचाल करणाऱ्या एसपीएम पॉलिटेक्निक कुमठे, सोलापूर येथे ऑनलाईन अर्ज भरणे व अर्ज निश्चितीची मोफत सुविधा केली आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाइन नोंदणी करताना कागदपत्रांच्या छायाप्रती अपलोड कराव्या लागतील. सद्यस्थितीमध्ये विद्यार्थ्याकडे दहावी मार्कशीट उपलब्ध नसल्याने केवळ दहावीच्या सीट नंबरच्या साह्याने विद्यार्थ्यांना ऑनलाईन फॉर्म भरता येईल. दहावीच्या निकालानंतर त्यांना मिळालेल्या गुणांची नोंद घेऊन पुढील प्रक्रिया होणार आहे. प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन अर्ज नोंदणीचे वेळापत्रक तंत्र शिक्षण संचलनालयाने प्रसिद्ध केले आहे. प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी एसपीएम पॉलिटेक्निक कुमठे येथील DTE मान्यता प्राप्त सुविधा केंद्र(६४२०) येथे भेट द्यावी.

प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी प्रा. गिरीजा दीक्षित (मो.नं ९७६७१०७१०४),प्रा.ज्ञानेश्वरजाधव(मो.नं९७६७१०७१०५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्या रोहिणी चव्हाण यांनी केले आहे.



## रिपाइं आठवले युवक आघाडीच्या राज्य उपाध्यक्षपदी किरण धाईंजे

✔ **अकलूज** : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले युवक आघाडीच्या राज्य उपाध्यक्ष पदी अकलूजचे युवक नेते किरणतात्या धाईंजे यांची मुंबई येथे मराठी पत्रकार मंडळ येथे युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष पप्पुजी कागदे व युवक आघाडीचे महाराष्ट्र सरचिटणीस डॉ विजय मोरे यांनी निवड केली.

सदर निवड केंद्रीय राज्यमंत्री रामदासजी आठवले व महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष व माजी राज्यमंत्री राजाभाऊ सरवदे यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली करण्यात आली.किरण धाईंजे हे गेली अनेक वर्षे आंबेडकर चळवळीतील नेते म्हणून सर्व जाती धर्मातील लोकांसाठी अहोरात्र काम करत आहेत.केंद्रीय राज्यमंत्री रामदासजी आठवले व राज्यमंत्री राजाभाऊ सरवदे यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाचे काम तन मन धनाने, प्रामाणिकपणे काम करत आहेत.त्यांचा निवडीमुळे माळशिरस तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहचे वातावरण निर्माण झाले आहे.येणाऱ्या काळात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्ष महाराष्ट्रातील गावागावात पोहचवण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे, व गावा गावात सर्व जाती धर्माच्या लोंकांना पक्षात सामावुन घेवुन युवक तरूणांना सामावुन घेणार आहे. प्रतिपादन त्यांनी केले आहे,

## फसवणुकीच्या तीन घटना सोलापुरात उघडकीस

✔ सुराज्य/सोलापूर

एटीएम मधून पैसे काढून देण्यास मदत करतो असे सांगत एटीएम कार्डाची अदलाबदल करत फसवणूक करण्यात आल्याच्या तीन घटना सोलापुरात उघडकिस आल्या आहेत. या तिनही घटना बाबत सदर बाझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पहिल्या घटनेत : फिर्यादी तात्यासाहेब दामोदर जमदाडे ( वय ६०, रा. वडाळा, उत्तर सोलापूर ) हे डफरीन चौकातील एटीएम मध्ये ३१ मे रोजी पैसे काढण्यासाठी गेले होते. तेव्हा तेथे असलेल्या इसमाने त्यांना जमदाडे यांना मदत करण्याच्या बहाण्याने जवळ येऊन पिन कोड पाहिले. त्यानंतर पैसे निघत नाहीत असे सांगितले. दरम्यान, त्याने एटीएम कार्डची अदला बदली करत त्यांच्या खात्यातून ४७ हजार १०० रुपये काढून घेत त्यांची फसवणूक केली.

दुसरी घटनाही डफरीन चौकातील एटीएम सेंटर येथे घडली असून तेथे फिर्यादी बबिता शिवाजी गावडे ( वय ४३, रा. एन जी मिल चाळ) हे पैसे काढण्यासाठी गेल्यानंतर आरोपींने हात चलाखी करत एटीएम कार्डची अदलाबदली केली. त्यानंतर त्यांच्या खात्यातून १५ हजार ९०० रुपये काढून घेत त्यांची फसवणूक केली.

तिसरी घटना रेल्वे स्टेशन परिसरातील एटीएम सेंटर जवळ घडली. यात फिर्यादी वर्षा बाळासाहेब शिंदे ( वय ६७, रा. न्यु लक्ष्मी चाळ, देगाव रोड) या एटीएम मध्ये गेल्या असताना आरोपींने हातचलाखीने एटीएम कार्डची अदला बदल केली. शिवाय त्यांच्या खात्यातील ११ हजार २०० रुपये काढून घेत त्यांची फसवणूक केली. ही घटना २६ मे रोजी घडली. या घटनांचा तपास पोसई माळी करत आहेत.

## सिव्हीलमधील सिटी स्कॅन मशीन तत्काळ दुरुस्त करा : अन्यथा भीक मांगो आंदोलन

### युवा सेनेचा इशारा

✔ सुराज्य/सोलापूर

छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय येथील बंद अवस्थेत असलेली सिटीस्कॅन मशीन तत्काळ दुरुस्त करावी अथवा नवीन सिटीस्कॅन मशीन उपलब्ध करावी अन्यथा युवा सेनेतर्फे भीक मांगो आंदोलन करण्याचा इशारा युवा सेनेचे शहराध्यक्ष विठ्ठल वानकर यांनी दिला आहे.

उद्धव बाळासाहेब ठाकरे युवा सेनेतर्फे शुक्रवारी जिल्हाप्रमुख बालाजी चौगुले आणि विद्यार्थी सेनेचे नेते लहू गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ वैशपायन स्मृती वैद्यकिय महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी बोलताना शहराध्यक्ष वानकर म्हणाले, सिटी स्कॅन मशीन गेल्या आठ महिन्यांपासून बंद असल्याने गोरगरीब रुग्णांचे हाल होत आहेत. सोलापूर शासकिय रुग्णालयातील प्रशासनाने सिटी स्कॅनबाबत तातडीने योग्य ती कार्यवाही न केल्यास रुग्णालय प्रशासनाच्या विरोधात भीक मांगो आंदोलन करण्याचा इशारा शहरप्रमुख वानकर यांनी दिला.



यावेळी युवा सेनेचे जिल्हा समन्वयक मुनीनाथ कारमपुरी, उपजिल्हाप्रमुख खंडू सलगरकर तालुकाप्रमुख विश्वनाथ कोगनुरे, कॉलेज कक्ष प्रमुख तुषार आवताडे, नितीन काटकर पृथ्वीराज चौगुले,केदार गवंडी, शुभम वानकर, आकाश घोरपडे, संकेत गोटे, शुभम भोपळे, राकेश मालकोटे, ओंकार उदावंत, नागेश चंदले सह युवा सैनिक उपस्थित होते.

## दुकानासमोर लावलेली दुचाकी पळवली

✔ सुराज्य/सोलापूर

सत्तर फुट परिसरात एका दुकानासमोर लावलेली दुचाकी अज्ञात चोराने चोरून नेली. याबाबत सागर गणेश शाहीर (वय-२९, रा. लोधी गल्ली) यांनी जेलरोड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.या फिर्यादीवरून अज्ञात चोरावर गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना ६ जून रोजी घडली.या घटनेचा तपास किवडे करत आहेत.

## वारीच्या वाटेवर शुद्ध पाणी व सावलीची सोय व्हावी : रामभाऊ चोपदार

✔ सुराज्य/नातेपुते



या वर्षी पायी वारीत उन्हाचा तडाखा अधिक असण्याचा अंदाज आहे. त्यामुळे प्रशासन, सामाजिक संस्था, वारीच्या वाटेवरील भाविकांनी वारकर्यांना अधिकाधिक शुध्द पाणी व सावलीची सोय उपलब्ध करून द्यावी अशी विनंती श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांचे चोपदार रामभाऊ चोपदार यांनी केले आहे.

श्री. रामभाऊ चोपदार यांनी सांगितले की, जुन महिना सुरू झाला असला तरी अद्याप कुठेही पाऊस झाला नाही. उन्हाची तीव्रता आहेच. सर्वात महत्वाचे पालखी महामार्गचे काम सुरू असल्याने वारीच्या वाटेवरील वृक्षतोड मोठ्या प्रमाणात झाली आहे. त्यामुळे वारकऱ्यांचा हक्काचा निवारा कमी झाला आहे.वारकऱ्यांच्या जिवीताला कोणताही धोका होऊ नये म्हणून प्रशासन, समाजसेवी संस्था, तरुण मंडळे व वारीच्या वाटेवरील लोकांनी जास्तीत जास्त शुध्द पाणी व सावलीची सोय उपलब्ध करून द्यावी. तसेच, मेडिकल मदत करणार्या संस्थांनी उष्माघाताचे संकट लक्षात घेऊन तयारी करावी.दरवर्षी वारीच्या वाटेवर अन्नदान मोठ्या प्रमाणात होते.



## श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये संस्कृत संभाषण वर्गाचा समारोप

✔ **सोलापूर** : श्री मल्लिकार्जुन हायस्कूल,हत्तुरे नगर,सोलापूर येथे संस्कृत संभाषण वर्गाचा समारोप कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष वैजिनाथ हत्तुरे व प्रमुख अतिथी श्रावण बिराजदार पुणे विभागीय अध्यक्ष महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघ,विद्यानंद स्वामी मुख्याध्यापक केंगनाळकर प्रशाला, धरेप्पा हत्तुरे रेवणसिद्ध जवळेकर यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या शिबिरातील विद्यार्थ्यांनी संस्कृत भाषेतील विविध गुणदर्शन कार्यक्रम सादर केले, तसेच विद्यार्थ्यांनी दहा दिवसाची वर्ग पूर्ण केल्यामुळे धन समर्पण केले. या समारोपास मारुती माने,अनिलकुमार गावडे, विद्यार्थी,पालक,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक निखिल बडवे यांनी केले,सूत्रसंचालन स्नेहा कोन्हाळी व केतकी कडगंची याने केले तर आभार स्नेहा पनशेट्टी यांनी मानले.

## प्रिसिजन कंपनीमध्ये पर्यावरण सप्ताह उत्साहात साजरा

✔ सुराज्य/सोलापूर

प्रिसिजन कंपनीने अगदी प्रारंभापासूनच पर्यावरण पूरक उत्पादन पद्धती अवलंबली आहे. कंपनीच्या चिंचोली प्लांटमध्ये ४५ एकरावरील हिरवागार निसर्ग हाच पर्यावरण प्रेमाची साक्ष देतो आहे.दि. ५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कंपनीत ३ ते ९ जून दरम्यान पर्यावरण सप्ताह साजरा करण्यात आला.



या सप्ताहात विविध उपक्रम राबविण्यात आले. यात प्लास्टिक प्रदूषणावर मात करा या थीमला घेऊन कंपनीमध्ये बॅनर लावणे, याच थीमला अनुसरून पोस्टर स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, वृक्षारोपण करणे, धोकादायक कचरा व्यवस्थापन याविषयात कर्मचाऱ्यांना ट्रेनिंग आदी कार्यक्रमांचा समावेश होता.

या स्पर्धेत भाग घेतलेल्या कर्मचाऱ्यांना आकर्षक बक्षिसे ही दिली जाणार आहेत. यावेळी कंपनीचे एचआर जनरल मॅनेजर राजकुमार काशीद, सेफ्टी मॅनेजर सुहास पाटील, सिद्धेश्वर चंदनशिवे, चिदानंद मुंदडगी, सत्यविजय बारस्कर, विष्णू साठे, सीमा देशमुख, पारितोष खेर, गिरीश देसाई, यु सी जैन, किर्ती बालगाम, कांचन साळवे यांसह सर्व वरिष्ठ व्यवस्थापक, विभाग प्रमुख उपस्थित होते.



## सिंहगड अभियांत्रिकीमध्ये विद्यार्थ्यांना निरोप

✔ **सोलापूर** : एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात पदवी अंतिम वर्ष विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे सहसचिव व सिंहगड सोलापूर चे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. एस एम जगदे, डॉ. आर. टी. व्यवहारे उपस्थित होते.

या निरोप समारंभासाठी सिव्हिल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, कॉम्प्युटर सायन्स, मेकॅनिकल, मधील विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी बोलताना कॅम्पस डायरेक्टर श्री. संजय नवले यांनी सर्व पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व अंतिम वर्षातील विद्यार्थी सिंहगड इन्स्टिट्यूट चे नाव उंचीवर नेतील असा विश्वास व्यक्त करून सर्वांना शुभेच्छा दिल्या.पुरस्काराचे वाचन प्रा. रवींद्र देशमुख यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन धनश्री तळेकर या विद्यार्थिनीने केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. सुनीता सगट, विद्यार्थी कल्याण मंडळाचे अधिष्ठाता डॉ. सुवर्णा क्षीरसागर, प्रा. रवींद्र देशमुख, प्रा. सुमेध पाठक यांनी परिश्रम घेतले. बेस्ट आऊट गोइंग स्टुडंट साठी प्रचंड चुरस दिसून आली. यामध्ये सिव्हिल डिपार्टमेंट मधून निकिता कोळेकर, मेकॅनिकल मधून चिन्मय झोड, कॉम्प्युटर सायन्स चा कृष्णात कापसे व पूर्ण कॉलेजमधून इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन विभागाचा अजय चौखंडे याला बेस्ट आऊट गोइंग चा पुरस्कार देण्यात आला. स्नेहल कोरटेकर हिला चार वर्षात सातत्याने अव्वल गुण मिळाल्याबद्दल व प्रतीक्षा गायकवाड हिला चार वर्षात सर्वात जास्त उपस्थिती बद्दल सन्मानित करण्यात आले.

## अडाणी लोकांना शिक्षणाचे महत्त्व कळल्याने अनेकांचे जीवन घडले : अरविंद जोशी

### होय, मी देव पाहिलाय या आत्मचरित्राचे प्रकाशन

✔ सुराज्य/सोलापूर

मागील पिढ्यांमध्ये स्वत: अडाणी असूनही शिक्षणाचे महत्त्व कळालेली माणसे होती. त्यातूनच वसंत नाईकनवरे यांच्यासारखी माणसे घडली. त्यांची आई निरक्षर होती, पण त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळालेले होते. त्यामुळे आपला मुलगा शिकला पाहिजे, मोठा झाला पाहिजे, अशी त्यांची तळमळ होती. त्यातूनच परिवर्तन घडले. या परिवर्तनाची यशोगाथा म्हणजे होय, मी देव पाहिलाय!' हे नाईकनवरे यांचे आत्मचरित्र आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व लेखक अरविंद जोशी यांनी केले.

शनिवारी सकाळी शिवस्मारक येथे जटायु अक्षरसेवा प्रकाशन संस्थेतर्फे होय, मी देव पाहिलाय' या आत्मचरित्राचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर लेखक वसंत नाईकनवरे,




प्रा. नभा काकडे, अश्विनी चव्हाण आणि सुजय निकते यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन ॲड. स्मिता सीताफळे, प्रस्तावना सुजय निकते तर आभार अश्विनी चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला लेखक नाईकनवरे यांनी आपला संपूर्ण जीवनपट प्रत्ययकारी पद्धतीने मांडला.

नदीकाठच्या तोंडले गावात मागासवर्गीय कुटुंबातील जन्म आणि तेथून कार्यकारी अभियंता होण्यापर्यंतचा जीवनप्रवास त्यांनी उलगडला. यावेळी त्यांचे मित्र, नातेवाईक यांची मोठी संख्या होती.

आत्मचरित्रात आवेश, द्वेष नव्हे आशयघनता

प्रा. नभा काकडे म्हणाल्या, होय, मी देव पाहिलाय' या आत्मचरित्राने मराठी आत्मचरित्रांत मोलाची भर टाकली आहे. आवेश, आक्रोश, द्वेष याऐवजी आशयघनता आणि सकारात्मकता प्रतिबिंबीत होणारे हे आत्मचरित्र आहे. सामान्य लोकांचे आत्मचरित्र कोण वाचतं, असे कोणी

म्हणतही असेल पण समाजपरिवर्तनाची खरी प्रक्रिया सामान्यांच्या जगण्यातूनच घडत असते. नाईकनवरे यांच्या आत्मचरित्राने इतिहास घडणार आहे. मागासवर्गीय समाजाच्या साहित्य इतिहासाला वळण देणारे हे पुस्तक ठरेल, असा आशावाद प्रा. काकडे यांनी व्यक्त केला.



## चंद्र सूर्य संस्थेच्यावतीने अहिल्यादेवी होळकर जयंती

**सोलापूर :** जुळे-सोलापुरातील शिवरत्न नगर येथे चंद्र सूर्य सामाजिक बहुउद्देशीय संस्थेतर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास शिवसेना जिल्हा उपप्रमुख शरणराज केंगनाळकर, अरिहंत शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अजय पोनम, जुळे सोलापूर बहुउद्देशीय समाजसेवी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप तडकल, वाघोली सूत गिरणीचे संचालक यश आठवले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य यतिराज होनमाने, डॉ. मायप्पा पडळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. चंद्र सूर्य सामाजिक बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सूर्यकांत होनमाने, उपाध्यक्ष चंद्रकांत मारकड, सचिव आंबादास पांढरे, सहसचिव विष्णू मारकड, खजिनदार महादेव पुजारी, भास्कर बंदपट्टे यांनी प्रमुख अतिथींचे स्वागत केले. सूत्रसंचालन कृष्णा कोळी यांनी केले तर वैभव मारकड यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्याध्यक्ष ओंकार ढेकळे, अक्षय हांडे, अजय हांडे, सुशांत होनमाने, तन्मय मारकड, ओंकार मारकड, गणेश कांबळे, आकाश धोत्रे, बंदू नदाफ, संतोष कांबळे, दत्ता होणमाने, बाळासाहेब होनमाने, अनिल होनमाने, पोपट शिंदे, मदने व चंद्र सूर्य कन्स्ट्रक्शनच्या टीमने परिश्रम घेतले.

## जेमिनी सांस्कृतिक संस्थेच्यावतीने जॉब फेअरचे आयोजन

**सोलापूर :** जेमिनी सांस्कृतिक संस्थेच्यावतीने येत्या रविवारी दि. ११ रोजी अथर्व गार्डन येथे जॉब फेअरचं आयोजन करण्यात आलं आहे. सोलापूर आणि परिसरातील १२ उत्तीर्ण असलेल्या १८ ते ३० वयोगटातील युवकांना याचा लाभ होईल. कन्नड आणि तेलुगू भाषिक युवकांना या नोकरीत प्राधान्यक्रम राहील, अशी माहिती पत्रकार परिषदेत जेमिनी सांस्कृतिकचे पदाधिकारी सुरेश पाटील यांनी दिली. हा मेळावा स. १० वाजता सुरू होणार असून दु. ३ वाजेपर्यंत आर्मका फायनान्स कंपनी पुणे यांचे प्रतिनिधी मुलाखती, परीक्षा घेतील. यानंतर लगेचच नोकरीचे प्रमाणपत्र देण्यात येईल. तरी जास्तीत जास्त युवकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे.

## परीट सेवाभावी समाज संस्थेतर्फे शालेय साहित्याचे वाटप

**सोलापूर :** परीट सेवाभावी बहुउद्देशीय समाज संस्था सोलापूरच्यावतीने १४ जून रोजी समाजातील गरजू १५० विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती संस्थेचे सागर गवळी यांनी पत्रकार परिषदेत दिली. हा कार्यक्रम समाज कल्याण केंद्र रंगभवन येथे दुपारी ४:३० वाजता होणार आहे. आज पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली. समाजाचे नेते देवाभाऊ काटकर यांच्या स्मरणार्थ राहुल काटकर यांच्यावतीने हे शालेय साहित्य देण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस आकाश ताटवे, दत्तात्रय काटकर, सागर गवळी, राहुल काटकर, गणेश वारे, संदीप भोसले, विवेक भोसले आदी उपस्थित होते.

## सांगली येथे शेतकरी संघटनेच्या मेळाव्याचे आयोजन

शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने सोमवार दि. २६ जून रोजी दुपारी १ वाजता सांगली येथील विष्णुदास भावे नाट्य मंदिरात शेतकरी मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. शुक्रवारी पत्रकार परिषदेत रघुनाथ पाटील यांनी याबाबत माहिती दिली. गोवंश हत्या बंदी व वन्य जीव संरक्षण कायदा रद्द करावा या दोन साखर कारखान्यातील अंतराची अट रद्द करावी. गुंठेवारी खरेदी विक्रीवरील बंधन काढून टाकावी. स्व. गोपीनाथ मुंडे ऊस तोडणी कामगार महामंडळासाठी प्रति टन दहा रुपयाप्रमाणे होणारी कपात रद्द करावी, शेतकऱ्यांना वीज बिल मुक्त करावं, जाहीर केल्याप्रमाणे नियमित कर्ज फेडणाऱ्यांना ५० हजार रुपये सानुग्रह अनुदान द्या, तसेच पेट्रोल डिझेलप्रमाणे म्हशीच्या आणि गाईच्या दुधास भाव द्यावा यासारख्या मागण्यांवर यात चर्चा होणार आहे. यासाठी पी. चेंगल रेड्डी, कालिदास आपेट, शिवाजी नांदखिले, ॲड. अजित काळे आदी मार्गदर्शन करणार आहेत.

## चोरी केल्याच्या संशयावरून मारहाण; झारखंडचे दोघे जखमी

**सोलापूर :** रस्ता दुरुस्तीचे काम चालू असताना लोखंडी साहित्य आणि इतर वस्तू चोरल्याच्या संशयावरून फावडा आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत लऊश जोकन शर्मा (वय २०) आणि देवराज गुटा पासवान (वय - ५२, दोघे रा. झारखंड सध्या रा. रेल्वे स्टेशन सिमेंट गोडाऊन जवळ) हे दोघे जखमी झाले. ही घटना रेल्वे स्थानकाजवळील लक्ष्मी चाळीजवळ गुरुवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. लक्ष्मीचाळ परिसरात रस्ता काँक्रिटचे काम चालू आहे. त्या ठिकाणी पडलेले साहित्य या दोघे चोरी करीत असल्याच्या संशय घेऊन अनोळखी ४ ते ५ इसमांनी त्यांना मारहाण केली, अशी नोंद सलगर वस्ती पोलिसात झाली आहे.

## हत्येचा रिपाइं गवई गटातर्फे निषेध

**सोलापूर :** नांदेड जिल्ह्यातील बोंडारा हवेली येथील अक्षय भालेरावची हत्या करण्यात आली. या हत्याचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया शहर जिल्हा सोलापूर व अल्पसंख्यांक विभाग सोलापूरच्यावतीने तीव्र निषेध करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयीन तहसीलदार यांना सुबोध वाघमोडे प्रदेशाध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या निवेदनाच्या माध्यमातून मागणी करण्यात आली. यावेळी शिष्टमंडळामध्ये जक्कप्पा कांबळे, रावसाहेब परीक्षा डे, श्रीकांत गायकवाड, श्रीमंत गायकवाड, सलीम मुल्ला, रफिक शेख, सिकंदर शेख, इम्रान शेख, इब्राहिम शेख, समीर मुजावर, मारुती सोनवणे, संदीप ससाने, सादिक शेख, महिला अध्यक्ष अरुणा सरवदे, नसरीन शेख, पुनम मोरे, अमिना शेख उपस्थित होते.

## छत्रपतींचा आणखी एक इतिहासपट येणार

**सोलापूर :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वावर आधारित अनेक ऐतिहासिक पट प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. अशातच एक नवीन ऐतिहासिक पट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे, त्याचे नाव 'सिंहासनाधीश्वर' असे आहे. रायगडावरील शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यात या चित्रपटाची घोषणा करण्यात आली. शकील खान यांची निर्मिती असलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन विजय राणे करणार आहेत. 'सिंहासनाधीश्वर' हा चित्रपट जून २०२४ मध्ये प्रदर्शित होणार आहे. यातील कलाकारांची नावे अद्याप जाहीर झालेली नाहीत.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाची धाड पाच जणांवर गुन्हा दाखल

### दोन दुचाकींसह दोन लाखांचा मुद्देमाल जप्त

सुराज्य/सोलापूर



राज्य उत्पादन शुल्क विभागाने शुक्रवारी सोलापूर शहर परिसरातील हातभट्टी दारू विक्री केंद्रांवर टाकलेल्या धाडीत पाच जणांविरुद्ध गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. यात दोन दुचाकीसह दोन लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

शुक्रवारी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक राहुल बांगर यांनी त्यांचे पथकासमवेत शहरातील विविध परिसरात टाकलेल्या धाडीत पाच जणांविरुद्ध गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत. शेळगी येथे गिरिजप्पा जानगवळी याच्या ताब्यातून २५ लिटर हातभट्टी दारू, न्यू पाच्छा पेठ येथील पुंडलिक अवधूत याच्या ताब्यातून साठ लिटर, मित्र नगर शेळगी येथील विलास बेलुरे याच्या ताब्यातून २५ लिटर, न्यू पाच्छा पेठ येथील मोहन सुभाष मादगुंडी याच्या ताब्यातून ४० लिटर व पाच्छा पेठ येथून अभिषेक देविदास वाघ याच्या ताब्यातून ३५ लिटर हातभट्टी दारु जप्त केली.

त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिवाय दक्षिण सोलापूरातील दोड्डी येथील सुरेश शिवाजी राठोड हा दुचाकीवरून हातभट्टी दारूची वाहतूक करताना त्यास अटक करण्यात आली आहे. तसेच दुय्यम निरीक्षक कृष्णा सुळे यांनी रंगभवन परिसरात एका दुचाकीवरून हातभट्टी दारूची वाहतूक होत असताना पाठलाग केला असता दुचाकीस्वार मोटरसायकल जागीच टाकून फरार झाला. त्याच्यावर ही गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक नितीन धार्मिक यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक राहुल बांगर, सदानंद मस्करे, सुनील कदम, किरण बिरादार, दुय्यम निरीक्षक कृष्णा सुळे, उषाकिरण मिसाळ, रामलिंग भांगे, अक्षय भरते, शिवकुमार कांबळे, सहायक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, गजानन होळकर, जीवन मुंढे, जवान शोएब बेगमपुरे, चेतन व्हनगुंटी, अशोक माळी, अनिल पांढरे, अण्णा कर्चे, किरण खंदारे व वाहन चालक रामचंद्र मदने यांच्या पथकाने केली.

## दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

राहत्या घरात लोखंडी अँगलला दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन इसमाने आत्महत्या केली. आनंद अभिमन्यू शिंदे (वय ५८, रा. मौलाली चौक) असे आत्महत्या केलेल्या इसमाचे नाव आहे. ही घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली. मृत आनंद हे रविवारी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास राहत्या घरातील लोखंडी अँगलला दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन लटकलेल्या अवस्थेत आढळले. नातेवाईकांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली.

माहिती मिळताच सदर बाझार लोखंडी अँगलला ठाण्याचे पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी नातेवाईकांच्या मदतीने त्यांना खाली उतरवून उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

## चुंगी-कुरनूर रस्ता निकृष्ट दर्जाचा होत असल्याची तक्रार

सुराज्य/अक्कलकोट



तालुक्यातील कुरनूर-चुंगी रस्ता निकृष्ट दर्जाचा होत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे याकडे अधिकारी वर्गाने लक्ष द्यावे, अशी मागणी सरपंच व्यंकट मोरे यांनी केली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून हा रस्ता दुरावस्थेत होता. आता या रस्त्याला प्रारंभ झाला आहे पण चालू असलेले काम हे दर्जेदार होण्याऐवजी निकृष्ट होत असल्याचे घटनास्थळी जाऊन संबंधित शेतकरी व गावकऱ्यांनी हे प्रकरण उघडकीस आणले आहे. संबंधित ठेकेदारांवर व अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. रस्त्याचे काम दर्जेदार करा अन्यथा काम बंद ठेवा, असेही त्यांनी सांगितले. शासन रस्त्यासाठी लाखो रुपये निधी मंजूर करत आहे पण गावोगावी असे निकृष्ट दर्जाचे रस्ते करून निधी वाया जात आहे, असे त्यांनी सांगितले.

चुंगी ते कुरनूर हा पन्नास वर्षानंतर पहिल्यांदाच होत आहे. त्यामुळे तो दर्जेदार व्हावा,अशी अपेक्षा आहे. हा रस्ता चार किलोमीटरचा असून रस्त्यालगत दोन्ही गावच्या बागायती शेती आहेत. त्यामुळे शेतकरी या ठिकाणी रात्री अपरात्री येत असतात. पावसाळ्याच्या वेळी या ठिकाणी प्रचंड प्रमाणात दलदल निर्माण होते आणि नागरिकांचे व शेतकऱ्यांचे प्रचंड हाल होतात. त्यामुळे हा रस्ता मजबूत करावा.जोपर्यंत रस्ता दर्जेदार होत नाही तोपर्यंत आम्ही रस्त्याचे काम सुरू होऊ देणार नाही. या बाबतीत संबंधित अधिकाऱ्याला फोन केला असता फोन उचलत नाहीत, अशी तक्रार त्यांनी यावेळी केली आहे.

## आरोग्य स्त्री परिचर प्रश्नांबाबत सावंतांशी राज्यकृती समितीची चर्चा

सुराज्य/सोलापूर



आयटक संलग्न महाराष्ट्राच्या अंशकालीन स्त्री परिचर कृती समितीच्यावतीने राज्याचे आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांना अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचर यांच्या मागण्यांच्या संदर्भात चर्चा करून संघटनेच्यावतीने धाराशिव येथील पालकमंत्री कार्यालयात कॉ. नामदेव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली चर्चा करून निवेदन देण्यात आले.

१ जून रोजी राज्यातील अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचरांचा राज्य मोर्चा काढण्याचे निवेदन मंत्री महोयांना देण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी दि. ५ जून रोजी चर्चा करण्याचे निमंत्रण संघटनेला दिले. त्याप्रमाणे आरोग्य मंत्री सावंत यांनी कृती समितीला भेट दिली. यावेळी त्यांनी लवकरच सचिव पातळीवरील बैठक लावू, त्या बैठकीचे प्रोसिडिंग तयार करू व किमान वेतनाच्या संदर्भात अंमलबजावणी करू असे संघटनेला आश्वासित केले तसेच बैठक लावण्याच्या सूचना दिल्या.

राज्यभरातील अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचर यांचे प्रश्न कित्येक वर्ष प्रलंबित आहेत. आरोग्य स्त्री परिचर यांना पूर्णवेळ काम करून घेतले जात असल्याने अर्धवेळ संबोधू नये. जिल्हा परिषदेच्या तीन व चार पदावर सामावून घ्यावे.

अठरा हजार रुपये किमान वेतन करावे. रजा, बोनस, सूट्टी, गणवेश, आयकार्ड, जनश्री विमा, थकीत वेतन देण्यात यावे, पाच तारखेच्या आत वेतन करावे या मागण्या मंत्री महोदयांकडे करण्यात आल्या आहेत.

यावेळी शिष्टमंडळामध्ये आयटकचे राज्य नेते कॉ. नामदेव चव्हाण, देविदास बोंदार्डे, हमिदा शेख, इंदुमती केवड, डॉ. प्रवीण मस्तुद, गफ्फार शेख, शिवाजी फुले हे बीड, औरंगाबाद, नांदेड, सोलापूर येथून उपस्थित होते.

## तांदुळवाडी विकास सेवा संस्थेच्या चेअरमनपदी राहुल उघडे

### व्हाईस चेअरमनपदी दत्तात्रय चव्हाण

सुराज्य/वेळापूर




तांदुळवाडी तालुका माळशिरस येथील तांदुळवाडी विविध कार्यकारी सेवा संस्थेची चेअरमन व व्हाईस चेअरमनपदाची निवड झाली. यावेळी प्रास्ताविक माजी चेअरमन उदयसिंह राजगुडे म्हणाले की, 'संस्थेची गतवर्षाचे कर्ज वाटप रक्कम ३ कोटींवरून ६ कोटींवर गेले आहे व नवीन १०० सभासदांना कर्ज उपलब्ध करून दिले आहे. याबद्दल सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे आभार व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, 'चालू वर्ष संस्था १०० टक्के बँक कर्ज फेडणार आहे, असे सांगितले.'

यावेळी निवडणुका अधिकारी जाधव यांच्याकडे चेअरमनपदासाठी व व्हाईस चेअरमनपदासाठी एक एकच अर्ज आल्याने तांदुळवाडी विकास सोसायटीच्या चेअरमनपदी रोहित उघडे व व्हाईस चेअरमनपदी दत्तात्रय चव्हाण यांची निवड निवडणूक अधिकारी यांनी बिनविरोध निवड जाहीर केली. यावेळी नूतन चेअरमन राहुल उघडे यांचा सत्कार उदयसिंह राजगुडे यांच्या हस्ते करण्यात आला तर नूतन व्हाईस चेअरमन दत्तू चव्हाण यांचा सत्कार गणपत गुजरे यांच्या हस्ते करण्यात आला तर माजी चेअरमन उदयसिंह राजगुडे यांचा सत्कार विश्वंभर चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला तर माजी व्हाईस चेअरमन गणपत गुजरे यांचा सत्कार दशरथ मिले यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाला सोसायटीचे संचालक दशरथ मिले, चंद्रकांत डोके, विश्वंभर चव्हाण, शहाजी लोखंडे, धनाजी चव्हाण, नानासो कदम, गयाबाई करांडे ज्ञानेश्वर उघडे, रामकृष्ण चव्हाण, माजी उपसरपंच शशिकांत कदम, माजी सरपंच चंद्रकांत लोखंडे, ग्रा. पं. सदस्य सतीश कदम, कैलास काकडे, रोहित काकडे, तेजस जाधव, रोहित उघडे सोसायटीचे सभासद कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दोन वाहनांची धडक; एक ठार, एक जखमी

सुराज्य/सांगोला

सांगोला मिरज रोडवर अनकढाळ टोळ नाक्याजवळ मोटरसायकल स्वरास ईरटीका गाडीने पाठीमागून धडक दिल्याने चंद्रकांत नाथा गाडे हे जागीच मरण पावले तर कबीर हरी गाडे हे गंभीर जखमी झाले आहेत.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, शुक्रवार ९ जून रोजी सायं. ७ च्या सुमारास रत्नागिरी-नागपूर महामार्गावरील अनकढाळ टोलनाक्याजवळ खडी क्रशर समोर हिरो होंडामोटर सायकलला ईरटीका गाडी नंबर एम. एच. १३ इ सी ४४३३ने जोरदार धडक दिल्याने मोटरसायकलवरील चंद्रकांत नाथा गाडे (रा. उदनवाडी) हे जागीच मरण पावले तर कबीर हरी गाडे हे गंभीर जखमी झाले आहेत.

त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात सांगोला येथे उपचार चालू आहेत. रात्री उशिरापर्यंत पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार घेण्याचे काम चालू होते.




## मैंदर्गी नगर परिषदेची ६९ व्या स्थानावरून १८ व्या स्थानावर झेप

### माझी वसुंधरा अभियान

सुराज्य/अक्कलकोट

मुख्याधिकारी श्रीकांत आण्णासाहेब लाळगे यांच्या पर्यावरणाविषयी असणाऱ्या तळमळीतून आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे मैंदर्गी नगर परिषदेने मागील वर्षीच्या ६९ व्या क्रमांकावरून लक्षणीय सुधारणा करत यावर्षी १८ व्या स्थानावर झेप घेतली आहे. ही कामगिरी म्हणजे मैंदर्गी शहरातील पर्यावरण प्रेमी जागरूक नागरिक, मैंदर्गी नगर परिषदेचे मुख्याधिकारी, मैंदर्गी नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष तसेच सर्व नगरसेवक आणि मैंदर्गी नगर परिषदेचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी वर्षभर केलेल्या सातत्यपूर्ण कामाची पावती असल्याचे बोलले जात आहे.

मैंदर्गी शहरातील नागरिकांचे, अभियानाला पाठिंबा दिलेल्या सर्व राजकीय नेत्यांचे आणि पर्यावरणप्रेमी समाजसेवी नागरिकांचे, मैंदर्गी नगरपरिषदेचे सर्व अधिकारी व कर्मचारी, सफाई मित्र व अभियानासाठी प्रयत्न केल्याबद्दल मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

# रोष वाढतोय, लवकर बैठक लावा

### ग्रीनफिल्ड बाधित शेतकऱ्यांचे बावनकुळे यांना साकडे

सुराज्य/अक्कलकोट



अक्कलकोट तालुक्यातील १६ गावांमधून जात असलेल्या चेन्नई सुरत ग्रीनफिल्ड हायवेच्या प्रकल्पात ५८३ शेतकऱ्यांची शेती बाधित होत आहे.

अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यातील बहुतांश लोकांचे जीवनमान पूर्णतः शेतीवरच अवलंबून आहे. अत्यल्प मोबदला जाहीर करून शासनाने शेतकऱ्यांना अडचणीत आणले आहे. दिवसेंदिवस रोष वाढत आहे.

शासनस्तरावर बैठकीची नितांत गरज असल्याचे निवेदन माजी नगरसेवक तथा संघर्ष समितीचे महेश हिंडोळे व सुरेखा होळीकट्टी यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केले. बुधवारी बावनकुळे हे अक्कलकोटच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी संघर्ष समितीचे पदाधिकारी व बाधित शेतकऱ्यांनी त्यांची भेट घेऊन अडचणी सांगितल्या.

यावेळी आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, उपसभापती अप्पासाहेब पाटील, तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, प्रदीप पाटील यांच्यासह पदाधिकारी व बाधित शेतकरी उपस्थित होते.

बावनकुळे यांना याविषयी बोलताना हिंडोळे म्हणाले की, 'राज्यात व देशात आपल्याच पक्षाचे सरकार आहे. ही जमेची बाजू असली तरी बाधितांना अत्यल्प मोबदला जाहीर झाल्याने शेतकरी अडचणीत येणार आहेत हे वास्तवदेखील आपण नाकारु शकत नाही.

याविषयी पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना बाधित शेतकरी प्रत्यक्ष भेटूनदेखील गेल्या चार महिन्यांपासून बैठक न झाल्याने दिवसेंदिवस सत्ताधाऱ्यांविषयी रोष वाढत चालला आहे. दोन दिवसांखाली अक्कलकोट तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर एकत्र येऊन चेन्नई सुरत ग्रीनफिल्ड हायवेचे काम बंद पाडले आहे. आवश्यक यंत्र, मशिनरींची तोडफोड केली आहे. यापुढील काळात त्यांचा रोष वाढू शकतो, ही बाब हिंडोळे यांनी स्पष्ट केली.

### लवकरच बैठक लावू : बावनकुळे

अक्कलकोट दौऱ्यात संघर्ष समितीचे महेश हिंडोळे यांनी ग्रीनफिल्ड हायवेच्या अत्यल्प मोबदल्याविषयी सविस्तर माहिती दिल्यानंतर प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपस्थितांना आश्वस्थ केले. ते म्हणाले की, 'याविषयी मला माहिती मिळाली आहे. बाधितांना योग्य न्याय मिळावा यासाठी आवश्यक कार्यवाही करू.शासनस्तरावर लवकरच बैठक लावून तोडगा काढण्यासाठी प्रयत्न असेल.

# कुर्डूवाडी-शेटफळ रस्त्यावर वारकऱ्यांच्या टेम्पो पलटी; १४ वारकरी जखमी

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

**वाशिम जिल्ह्यातून पंढरपूरकडे निघालेल्या वारकऱ्यांचा टेम्पो चालकाचे नियंत्रण सुटल्याने टेम्पो रस्त्याखाली जाऊन पलटी झाल्याने पुरुष व महिला असे १४ वारकरी किरकोळ जखमी झाले आहेत. ही घटना दि. १० रोजी पहाटे ३ वाजताच्या सुमारास लऊळ ता. माढा येथील भोंग वस्ती जवळ घडली. वारकरी प्राथमिक उपचार घेऊन पंढरपूरकडे रवाना झाले.**

पंढरपूरच्या विठ्ठलाची आषाढी वारी काही दिवसावर आली असून मराठवाड्यातून अनेक वारकरी विठ्ठलाच्या दर्शनासाठी खाजगी वाहनाने व आपल्या वाहनांनी दर्शनासाठी पंढरपूरकडे जात असतात मु.पो. ताकतोडि ता. मालेगाव, वाशिम जिल्ह्यातील वारकरी पिकप टेम्पो मधून पंढरपूरकडे दर्शनासाठी निघाले असताना कुर्डूवाडी- शेटफळ रोडवरील लऊळ ता. माढा हद्दीतील भोंग वस्ती जवळ पहाटेच्या ३ वाजताच्या सुमारास आला असता पिकप क्र. एम. एच.३७ टी. १९३० वरील चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे रस्त्याखाली जाऊन टेम्पो पलटी झाला. यामध्ये पुरुष व महिला असे एकूण १४ वारकरी जखमी झाले. यांच्यावर कुर्डूवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून सर्व वारकरी एसटीने पंढरपूर कडे रवाना झाले. या अपघातात चालक गंभीर जखमी झाला आहे.

तर पंढरपूरची आषाढी वारी काही दिवसावर येऊन ठेपली आहे. यामुळे मराठवाड्यातून पंढरपूरकडे जाणाऱ्या वाहनांची मोठ्या प्रमाणात संख्या असते. या दोन ठिकाणी डांबरीकरण किंवा काँक्रिटीकरण करतील का?




## प्रशासन मोठ्या अपघाताची वाट पाहते का?

कुर्डूवाडी शेटफळ रोडवरील लऊळ व बावी या दोन ठिकाणी रस्ता काँक्रिटीकरण गेल्या दोन वर्षापासून करण्यात आला नाही. अचानक रस्ता खराब येत असल्यामुळे वाहनांचा या ठिकाणी अपघात होत आहेत .प्रशासन मोठ्या अपघाताची वाट पाहत आहे का? असा सवाल प्रवाशातून विचारला जात आहे.

## खराब रस्ता त्वरित दुरुस्त करण्याची मागणी

**कुर्डूवाडी शेटफळरोड दोन ठिकाणी धोकादायक**

कुर्डूवाडी- शेटफळ रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्यात आले आहे. मात्र गेल्या दोन वर्षापासून लऊळ पुलावर व बावी ता. माढा येथील रस्त्या काँक्रिटीकरण करण्यात आले नाही. यामुळे या ठिकाणी वारंवार अपघात होत आहेत. हा वारकऱ्यांचा पहिला अपघात आहे अजून प्रशासन किती अपघाताची वाट पाहणार असा सवाल प्रवाशातून उपस्थित होत आहे.



## राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेल प्रदेशाध्यक्षपदी निवडीबद्दल आखाडे यांचा सत्कार

✔ **वेळापूर** : अरण ता. माढा येथे सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण काका आखाडे यांची राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश ओबीसी सेलच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल यांचा सत्कार सावता परिषद प्रदेश उपाध्यक्ष व वेळापूर विविध कार्यकारी सेवा संस्थेचे व्हाईस चेअरमन महादेवभाऊ ताटे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी कल्याणराव आखाडे यांची राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेल वर अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस महादेवभाऊ ताटे यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी सावता परिषद मुख्य प्रदेश संघटक संतोष राजगुरू, वेळापूर माजी सरपंच मल्हारी बनकर, वेळापूर शिवगंगा दुध डेअरीचे चेअरमन भागवत गायकवाड व उमेश भानवसे, सावता महाराज वंशज रमेश महाराज वसेकर, सोलापूर जिल्हा अध्यक्ष मृदुल माळी,जिल्हा संघटक बाळासाहेब ढगे, माढा तालुका अध्यक्ष भारत कुबेर, सयाजी बनसोडे, राजू काळे, विष्णुपंत खेत्रे, सावता परिषदेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## मनोरमा बँकेच्या संचालकपदी 'स्वेरी'चे डॉ. बी. पी. रोंगे यांची निवड



✔ **पंढरपूर** : सोलापूर जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या व वार्षिक सुमारे साडे नऊशे कोटी रुपये उलाढाल असणाऱ्या मनोरमा सहकारी बँकेच्या नूतन संचालकपदी पंढरपूर येथील स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. बँकेचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत मोरे यांच्या नेतृत्वाखाली बँकेची ही बिनविरोध निवडणूक पार पडली. नव्या संचालक मंडळामध्ये स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांचा समावेश करण्यात आला आहे. मनोरमा बँकेच्या पुणे व सोलापूर येथे सहा शाखा आहेत तसेच मनोरमा मल्टीस्टेटच्या ७२ शाखा आहेत, मनोरमा बँक, मनोरमा मल्टीस्टेट व इतर संस्था यांची एकूण वार्षिक उलाढाल सुमारे एक हजार ९५० कोटींची आहे. बँकेचा एनपीए गेल्या पाच वर्षांपासून शून्य टक्क्यांवर आहे. तसेच नव्याने होणाऱ्या पंढरपुर शाखेच्या वाटचालीसाठी डॉ. बी.पी. रोंगे सरांचा सक्रीय सहभाग व बहुमोल मार्गदर्शन निश्चितपणे मोलाचे ठरेल.' असे गौरवोद्गार बँकेचे चेअरमन व मनोरमा परिवाराचे मार्गदर्शक श्रीकांत मोरे यांनी काढले. पंढरपूर तालुक्यातील राजकिय व शैक्षणिक क्षेत्रातून डॉ.रोंगे सरांच्या या निवडीचे स्वागत केले जात आहे.

## सूरज जोजन यांची स्पेन येथे प्रोजेक्ट वर्कसाठी निवड



✔ **अक्कलकोट** : येथील सिमेंट डिलर तथा भाजप शहराध्यक्ष शिवशरण जोजन यांचे चिरंजीव सुरज शिवशरण जोजन, ' वंडरलँड इंडस्ट्रीज, नेदरलँड्स' या कंपनी मध्ये सिनियर लीड इंजिनीयर या पदावर कार्यरत असून त्यांचे बार्सीलोना, स्पेन येथे प्रोजेक्ट वर्कसाठी निवड झाली आहे. सुरज जोजन याचे प्राथमिक शिक्षण लायन्स क्लब अक्कलकोट येथे माध्यमिक शिक्षण जवाहर नवोदय विद्यालय, पलूस उच्च माध्यमिक साठी बी,जे, एस जैन कॉलेज वाघोली व इंजिनिअरिंग विश्वकर्मा इन्स्टिट्यूट पुणे येथे झाले आहे. त्यांचा निवड कॅम्पस मधुन झाले आहे. रविवारी ते मुंबई इथून स्पेन करता प्रयाण करत आहेत. त्यानिमित्ताने पुढील प्रवासासाठी शुभेच्छा.

त्यांच्या परदेश निवड साठी डॉ. जय सिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी, आमदार सचिन कल्याणशेट्टी नातेवाईक व मित्रपरिवार वतीने शुभेच्छा देण्यात आले.



## श्री जगद्गुरु पंचाचार्य संस्थेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

✔ **अक्कलकोट** : श्री जगद्गुरु पंचाचार्य माध्यमिक उच्च माध्यमिक प्रशालेतील इयत्ता दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे विश्वस्त शिवाचार्य रत्न श्री ष.ब्र डॉ. जय सिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजींच्या हस्ते सत्कार करण्यात आले. **कन्नड माध्यम प्रथम तीन क्रमांक** : १) कुमारी निर्मला लक्ष्मीपुत्र कुंभार ९२.००% २) अंजली शिवानंद कुंभार ८४.८०% ३) प्रतीक्षा सोमण कुंभार ८३.६०% **मराठी माध्यम प्रथम तीन क्रमांक** : १) केतन रामेश्वर राठोड ८७.८०% २) रतिकांत विठोबा पाटील ८४.४०% ३) अविनाश रवी कांबळे ८३.२०% **इयत्ता बारावी गुणवंत विद्यार्थी** : १ सानिया सय्यद ८२.३३% २) प्रतीक्षा माळी ८०.५०% ३) अजय चव्हाण ७८.५०% यावेळी मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी,पर्यवेक्षक नारायण मोरे सर्व शिक्षक बंधू भगिनी शिक्षकेतर सेवक वर्ग व पालक उपस्थित होते.

## तरुणाला मारहाण, चौघांवर गुन्हा

✔ **सोलापूर**: किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून तरूणाला काठीने मारून जखमी केल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे.म.जैद हारूण पटेल ( वय-२१, रा.नागनाथ नगर,विमानतळ जवळ) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून सायरा शेख, सलाम शेख, नुरजहाँ शेख, मोमीन शेख यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा तपास चव्हाण करत आहेत.

सुराज्य सोलापूर Classified

नोकरी विषयक

Ex. Service Man at
**Valsang Toll Plaza**
(Neeraj kumar)
interested Candidate
Contact at Toll Plaza.
Mob No. : 9028919046

(120623)

# आमचे कमिशन आम्हाला द्या माळशिरसमध्ये रेशन दुकानदाराची मागणी

✔ सुराज्य/अकलूज

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील रास्त भाव धान्य दुकानदार संघटने कडून अन्न नागरी पुरवठा मंत्री रवींद्र चव्हाण यांना माळशिरस तालुका दुकानदाराच्या वतीने मागील वर्षी मधील प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना अंतर्गत चे कमिशन व दुकानदारांनी नोव्हेंबर डिसेंबर मध्ये चलनाद्वारे भरणा केलेली रक्कम तसेच १ जानेवारीपासून एक रुपयाही शासनाने कमिशन दिलेले नाही. परंतु इतर खर्च हा दुकानदारांना स्वतः करावा लागत आहे व बिल न मिळाल्यामुळे दुकानदाराचे उदरनिर्वाह होणे हलाक्याचे बनले आहे.

तसेच यामुळे दुकानदाराची परिस्थिती अत्यंत बिकट झाली असून उसने पैसे घेऊन व कर्ज काढून दुकान चालवण्याची वेळ ही दुकानदारावर आली आहे. कमिशन न मिळाल्यामुळे दुकान चालवणे आता अशक्य झाले आहे तरी दुकानदाराचे गंभीरपूर्वक विचार करावा अशा पद्धतीचे निवेदन संघटनेच्या वतीने देण्यात आले.तसेच अर्जुनसिंह मोहिते पाटील यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील रास्त भाव धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष विजय मंडलिक यांचा वतीने अन्न नगरी पुरवठा मंत्री रवींद्र चव्हाण यांचा संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी तालुक्यातील शासकीय अधिकारी कर्मचारी वर्ग तसेच रेशन दुकानदार संजय खराडे, श्रीराम जाधव ,रणजितसिंह भगत, अक्षय मिले, सुरज साखरे, नाना काकडे उपस्थित होते.

### अन्न नागरी पुरवठामंत्री रवींद्र चव्हाण यांना निवेदन



कमीशन मिळत नसल्याने धान्य दुकानदार यांचा उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे.यावर मंत्री महोदयांनी कमिशन बाबत तात्काळ पुरवणी करून हा प्रश्न मार्गी लावण्यात येईल असे सांगण्यात आले. **– विजय मंडलिक**

अध्यक्ष, स. म. शंकरराव मोहिते पाटील स्वस्त धान्य दुकानदार संघटना

# पाऊस लांबल्याने खरिपाच्या पेरण्या थांबल्या

✔ सुराज्य/सोलापूर

यंदाच्या वर्षी तीन आठवडे पाऊस लांबल्याने खरिपाच्या पेरण्या कोळंबल्या असल्याचे जिल्हा कृषी अधीक्षक श्री गाव साने यांनी सांगितले.

मागील वर्षी मे जून मध्ये अवकाळी पावसाच्या अधून मधून सरी येत होत्या त्यामुळे वेळेवर पडणाऱ्या पावसाचे आणि अधून मधून पडलेल्या पावसाचे खरीप पिकाला चांगले जीवदान मिळालेले मागच्या वर्षी खरीप पिके बऱ्यापैकी उत्पन्न मिळाले होते. त्यामुळे शेतकरी राजा आनंदात होता. मागील वर्षी तीन लाख ५९ हजार हेक्टरवर खरीप पिकाचे लागण करण्यात आली होती यामध्ये ४७१७ हेक्टर सोयाबीन ९ हजार २६२ सूर्यफूल १२ हजार ६२८. तूर ८४ हजार ६९%. मुगा ९००० उडीद ६९ हजार २५० हेक्टर तृणधान्य बाजरी २१ हजार १५९ मका साठ हजार ४१५ अशा प्रकारचे मागील वर्षी खरीप पिकाची जिल्ह्यामध्ये पेरणी झाली होती.

या खरीप हंगामामध्ये भुईमूग सोयाबीन सूर्यफूल तसेच बाजरी ज्वारी आणि मका धान्य घेण्यात येथील खरीप हंगामामध्ये ऊस पिकाचे लागवडीचे क्षेत्रफळ वेगळे राहणार आहे. खरीप हंगामामध्ये जिल्ह्यात एकूण तीन लाख ५९ हजार हेक्टरवर ही खरीप पिके घेण्यात आली होती.



# विजयदादांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

✔ सुराज्य/अकलूज

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शिवामृत भवन, सदाशिवनगर येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी झालेल्या रक्तदान शिबिरास उदंड प्रतिसाद लाभला.

यावेळी सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील व रत्नप्रभादेवी मोहिते पाटील उर्फ आक्कासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून शिबिराचे उदघाटन विधानसभा आमदार राम सातपुते यांचे शुभहस्ते करण्यात आले.यावेळी माजी जि प उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख, मा सौ सत्यप्रभादेवी मोहिते पाटील, जि प सदस्या स्वरूपाराणी मोहिते पाटील, अरुण तोडकर, जि प सदस्या सुनंदा फुले, मंगलताई वाघमोडे, सुनंदा फुले, संगीताताई मोटे, माजी सभापती वैष्णवीदेवी मोहिते पाटील, माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील, प्रतापराव पाटील, शंकरराव भानवसे, विश्वतेजसिंह मोहिते पाटील, रिपाइं चे जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, नगराध्यक्ष डॉ आप्पासाहेब देशमुख, प्रा. नरेंद्र भोसले, भिलारे भाऊ, ॲड. बी वाय राऊत, गणपतराव वाघमोडे, पं स सदस्य माऊली पाटील, संदीप सावंत, सुभाष कुचेकर, सावता ढोपे, बाळासाहेब होले, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आप्पासाहेब रूपनवर, संदीप पाटील, शिवामृतचे संचालक अरविंद भोसले, लक्ष्मण पवार, शरद साळुंखे, अनंतलाल दोशी, माऊली सूळ, नारायण सालगुडे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक, सहकार महर्षी कारखान्याचे संचालक, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र पुरंदावडे चे अधिकारी सोनाली परतवार व सर्व स्टाफ, तसेच अक्षय ब्लॅक बँक चे चेअरमन संजयकुमार शिंदे व सर्व स्टाफ, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील ब्लड बँक अकलूज चे सर्व स्टाफ, तसेच यावेळी शिवरत्न वेलफेअर ट्रस्ट, माजी जि प सदस्य, माजी पं स सदस्य, श्री शंकर सहकारी कारखान्याचे संचालक, सर्व सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

तसेच या अनुषंगाने पर्यावरणाचा वाढता ऱ्हास रोखण्यासाठी वृक्षलागवड व्हावी म्हणून प्रत्येक रक्तदात्यास एक वृक्ष तसेच आदरणीय विजयदादांच्या संकल्पनेतून श्री शंकर सहकारी चे चेअरमन तथा विधानपरिषद आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने सर्वांना स्वच्छ फिल्टर चे पाणी मिळावे म्हणून कारखाना कार्यस्थळी ॲरो प्लॅन्ट उभारून मोफत पाण्याची सोय उपलब्ध करून दिली व आज प्रत्येक रक्तदात्यांस जार वाटप करण्यात आले, आदरणीय विजयदादांच्या आवडीचे सामाजिक, पर्यावरण व आरोग्य विषय उपक्रम राबवून एक अनोखा आदर्श निर्माण केला.

# मध्यप्रदेशचे शिक्षणमंत्री पवैया आज सोलापूर जिल्हा दौऱ्यावर

✔ सुराज्य/सोलापूर

मोदी ९ महा-जनसंपर्क अभियान माहिती देण्यासाठी मध्यप्रदेशचे शिक्षण मंत्री जयभानसिंह पवैया रविवार ११ जून रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहे अशी माहिती सोलापूर, सांगली पुण्याचे क्लस्टर प्रमुख आमदार सुभाष देशमुख यांनी दिली.

दिनांक ११ जून रोजी सकाळी दहा वाजता विठ्ठल रुक्मिणी दर्शन, अकरा वाजता मंगळवेढा येथील विरंगुळा नर्मदा पार्क शेजारी जेष्ठ कार्यकर्त्यांचा मेळावा होणार आह. दुपारी एक वाजता कंदलगाव (तालुका दक्षिण सोलापूर) येथे टिफिन बैठक, दुपारी अडीच वाजता मंद्रूप येथील गांधी भवन येथे बूथ कार्यकर्ता संमेलन होणार आहे. सायंकाळी पाच वाजता शासकीय विश्रामगृह येथे कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी तर सायंकाळी साडेसहा वाजता विधानसभा मतदारसंघ स्तरीय लाभार्थी संमेलन राजफंक्शन हॉल, सरवदे नगर, मुळेगाव रोड येथे होणार आह. नंतर ते बार्शी येथे रवाना होणार आहेत असे आमदार सुभाष देशमुख यांनी सांगितले.

# वाहनाच्या धडकेत तरूणाचा मृत्यू

✔ सुराज्य/सोलापूर

वाहन चालवण्याचा परवाना नसतानाही रिक्षा व दुचाकी चालवत दोन वाहनांची धडक झाली. यात दुचाकीवरील श्रीनिवास उमाकांत पोन्नम याचा मृत्यू झाला. याप्रकरणी रिक्षा चालक मेहबुब खताळ करीमजी, दुचाकी चालक श्रीनिवास पोन्नम यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पोलिस करत आहेत. ही घटना ९ जून रोजी दुपारी विनायक नगर परिसरात घडली. याबाबत हवालदार दत्तात्रय नवले यांनी फिर्याद दिली आहे.

# आर्यमान शुटिंग क्लबच्या खेळाडूंचे नेमबाजी स्पर्धेत यश

✔ सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील आर्यमान शुटींग क्लब व नेमबाजी प्रशिक्षण केंद्राच्या तिन खेळाडुंनी दैदीप्यमान यश संपादन केले. यामध्ये महाराष्ट्र रायफल अशोसिएशन वरळी ( मुंबई) येथे १ ते ५ जुन या दरम्यान झालेल्या कपटन एस जे इजिकल राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धेत पिलीव येथील आर्यमान शुटींग क्लबच्या खेळाडूंनी दैदीप्यमान यश संपादन केले.

यामध्ये यशश्री रणदिवे हिने तीन सुवर्ण तर एक रौप्य पदक मिळवले तर सिध्दी नितीन राजमाने हिने दोन कांस्यपदक मिळविलि तर यशराज गुजरे याने दोन गटात चतुर्थ क्रमांक मिळविला,व विश्वजित गुजरे हे दोघे उपराष्ट्रिय स्पर्धेकरिता पात्र ठरले.या खेळाडुंची आल इंडीया जि व्हि माळवणकर नेमबाजी स्पर्धेसाठि निवड झालि. यावेळी नेमबाज रुद्रांश बाळासाहेब पाटील, रायफल अशोसिएशनचे अध्यक्ष अशोक पंडित, सचिव शिला कानगो, सहसचिव अनिल रासकर उपस्थित होते. वरील सर्व यशस्वी खेळाडुंना प्रशिक्षक आकाश गुजरे यांचे मार्गदर्शन लाभले.



# मोहोळ तालुक्यात खरिपाच्या पेरण्या खोळंबल्या; शेतकरी चिंतेत

✔ सुराज्य/चिखली

मोहोळ तालुक्यात मृग नक्षत्रातवर खरीप हंगामातील पेरण्या केल्या जातात. मात्र मृग नक्षत्र सुरू झाले, तरी पेरण्या झालेल्या नाहीत. यावर्षी उन्हाच्या तडाखा मोठ्या प्रमाणात आहे. पाऊस हुलकावणी देत असल्याने देत असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत.

मोहोळ तालुक्यात पाऊस नसल्याने मशागती ठप्प आहेत. यामुळे या वर्षीचा मृग नक्षत्रातील खरीपाचा पेरा हुकला आहे. पावसाच्या आगमनानंतर मशागती होऊन पेरण्या होतील. त्यामुळे पेरण्या लांबणीवर पडणार आहेत. शेतकरी पावसाच्या प्रतिक्षेत आहेत. या वर्षी जूनचा पहिला आठवडा संपला, तरी पावसाचे आगमन नाही. मागील वर्षी जूनमध्ये खरिपाच्या पेरण्या झाल्या होत्या. दरवर्षी उन्हाळ्यात होत असलेल्या पावसामुळे खरीपपूर्व मशागती होत. येथील शेतकरी मृगावर तुर, उडीद, मुग, मका, सोयाबीन आदी पिकांची पेरणी करत. सध्या ऊन व ढगाळ वातावरणाचा खेळ सुरू आहे. काही शेतकऱ्यांनी तर शेतात शेणखताचे ढीग मारले आहेत. पण पाऊस नसल्याने मशागती सुध्दा खोळंबल्या आहेत. काही ठिकाणी तर पाऊस होईल, या आशेवर शेतकरी खरीप पेरणीपूर्व मशागती करताना दिसत आहेत. विशेष म्हणजे - तालुक्याच्या ठिकाणी असणारी कृषी केंद्र सुध्दा ओस पडू लागल्याचे चित्र आहे. शेतकऱ्यांनी खरीप पेरणीसाठी लागणारे बी-बियाणे, खते अद्यापही खरेदी केलेली नाहीत. त्यामुळे कृषी दुकानदार सुध्दा ग्राहकांच्या प्रतिक्षेत आहेत. शेतकरी पावसाची चातक पक्षाप्रमाणे वाट पाहत आहेत. पाऊस पडल्यानंतरच खरिपाच्या पेरण्या होणार असून, खरीप हंगाम लांबणीवर पडण्याची चिन्हे दिसून येत आहेत.



## महत्त्वाचे वृत्त

### डोंगरीतून ५० कोटींचे अंमली पदार्थ जप्त

**मुंबई** : अंमलीपदार्थ नियंत्रण विभागाने (एनसीबी) डोंगरी परिसरात केलेल्या कारवाईत २० किलो मेफेड्रोन (एमडी) जप्त केले. याप्रकरणी महिला तस्करासह तिघांना अटक करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या अंमलीपदार्थांची किंमत ५० कोटी रुपये असून, या छाप्यात एक कोटी १० लाख रुपयांची रोख रक्कम व १८६ ग्रॅम सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले. दाऊद टोळीच्या उलाढालींचे प्रमुख केंद्र असलेल्या डोंगरी परिसरात मेफेड्रोनचे वितरण करणारी टोळी कार्यरत असून ती मुंबई व परिसरात त्याचे वितरण करीत असल्याची माहिती मुंबई एनसीबीला मिळाली होती. या माहितीच्या आधारे मुंबई एनसीबीचे विभागीय संचालक अमित घावटे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने परिसरात पाळत ठेवली. खबऱ्यांमार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे एन. खान ही व्यक्ती अंमलीपदार्थांच्या वितरणात सक्रिय असून लवकरच मेफेड्रोनचा मोठा साठा येणार असल्याचे अधिकाऱ्यांना समजले.

### सुनक यांच्यावर पाच भारतीय भाषेत पुस्तक

**पुणे** : ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांच्यावर पत्रकार दिगंबर दराडे यांनी लिहिलेलं पुस्तकाच्या एका महिन्यांमध्ये तब्बल पाच आवृत्या निघाल्या आहेत. आता हे पुस्तक हिंदी, इंग्लिश, कन्नड, गुजराथी सह जर्मन भाषेतही काढण्यात येणार आहे. लंडन येथे जाऊन दराडे यांनी आपल्या पुस्तकामध्ये सुनक यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू उलगडले आहेत. युवक आणि युवतींकडून खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे. लंडनमध्ये राहत असलेल्या आणि तिकडे शिक्षण पूर्ण करून आलेल्या तरूणांच्याकडून या पुस्तकाचे विशेष कौतुक होत आहे. इन्फोसिसचे संस्थापक नारायण मूर्ती व सुधा मूर्ती यांचे ते जावई आहेत. ज्या देशाने आपल्यावर दीडशे वर्ष राज्य केले त्या देशाचा पंतप्रधान एक भारतीय वंशाचा आणि हिंदू आहे. या अभूतपूर्व घटनेने भारतीय म्हणून आपली छाती नक्कीच फुलून येत आहे, असं दिगंबर दराडे यांनी सांगितले.

### पुराची आगाऊ सूचना मिळणार

**मुंबई** : नागरिकांना पावसाळ्यात पूरस्थितीची आगाऊ सूचना मिळावी आणि जीवित-वित्तहानी टळावी या उद्देशाने मुंबई महानगरपालिकेने 'आयफ्लोज' ही अत्याधुनिक प्रणाली नुकतीच कार्यान्वित केली असून, या यंत्रणेमुळे ६ ते ७२ तास अगोदर संभाव्य पूरप्रवण क्षेत्रांना सतर्कतेचा इशारा देणे शक्य होणार आहे. मुंबई महानगरपालिकेचा आपत्कालीन व्यवस्थापन विभाग आणि राष्ट्रीय समुद्रीतट संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पूरप्रवण क्षेत्रात पूरस्थितीबाबत आगाऊ सूचना देणारी प्रणाली विकसित करण्यात आली आहे. कोणत्या भागात पूर येऊ शकतो, पुराच्या पाण्याची उंची किती असेल, याची माहिती या यंत्रणेद्वारे प्राप्त होणार आहे.

### मुंबईत डबेवाल्यांसाठी सरकारी घरे

**मुंबई** : गेल्या कित्येक वर्षांपासून मुंबईतील चाकरमान्यांची नि:स्वार्थपणे सेवा करणाऱ्या डबेवाल्यांनाही हक्काचे घर देण्यासाठी सरकारने पुढाकार घेतला आहे. त्यानुसार शहरातील डबेवाले कामगारांना घरकुले उपलब्ध करून देण्यासंदर्भात लवकरच धोरण निश्चित करण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिली. आपल्या विविध मागण्यांबाबत डबेवाल्यांच्या शिष्टमंडळाने फडणवीस यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. या वेळी आमदार श्रीकांत भारतीय, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर सिंह, 'म्हाडा'चे उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता, नूतन मुंबई टिफिन बॉक्स सप्लायर्स चॅरिटी ट्रस्टचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### प्रवेशद्वाराची कमान कोसळून बालकाचा मृत्यू

**पुणे** : नियोजित गृहप्रकल्पातील प्रवेशद्वाराची कमान कोसळून सात वर्षांच्या बालकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. दुर्घटनेस जबाबदार असल्याप्रकरणी ठेकेदारासह दोन कामगारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अर्णव मिथीलेश राय (वय ७, सध्या रा. गुलमोहोर सोसायटी, वाघोली, नगर रस्ता) असे मृत्युमुखी पडलेल्या बालकाचे नाव आहे. अर्णवचे वडील मिथिलेश राय (वय ३६) यांनी या संदर्भात लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ठेकेदार सिराज मुल्ला, कामगार दाजीज इबन खान, रामप्रवेश राधेशाम राय (रा. पोरवाल रस्ता, लोहगाव) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### १४ पिस्तुल, १८ काडतुसे जप्त

**बुलढाणा** : मध्यप्रदेश राज्याच्या सीमेला लागून असलेल्या जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यात ठाणे पोलिसांनी धाडसी कारवाई केली. या कारवाईत तब्बल १४ देशी पिस्टल, २५ मेगझिन, ८० जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी ठाणे हद्दीत केलेल्या कारवाईनंतर ठाणे पोलिसांनी चिकाटीने पाठपुरावा करून ही कारवाई केली आहे. यापूर्वी मागील १ जून रोजी ठाण्याच्या राबोडी पोलिसांनी एकाला ठाण्यात जेरबंद केले होते. त्याच्याकडील गावठी पिस्टल जप्त करून चौकशीनंतर ठाणे पोलिसांनी संग्रामपूर (जिल्हा बुलढाणा) तालुक्यातील सोनाळा पोलीस हद्दीत ही कारवाई केली.

### नोकरानेच लावली दुकानाला आग

**वर्धा** : शुक्रवारी पहाटे आर्वी येथील भंगार दुकानास आग लागून सात लाखांचा माल भस्मसात झाला. याप्रकरणी आर्वी पोलिसांनी तपास सुरू केल्यावर आश्चर्यकारक खुलासा झाला. आरोपी आश्विन चवरे हा अशोक जिरापुरे यांच्या भंगार दुकानात कामाला होता. दोन महिन्यांपूर्वी काही कारणाने त्याला कामावरून कमी करण्यात आले. त्याचा राग मनात ठेवून असलेल्या आश्विनने गुरुवारी रात्री लगतच्या दुकानातील ओट्यावर झोपल्याचे सोंग घेतले. रात्री सर्वत्र सामसूम झाल्यावर गोट्याने जिरापुरे यांच्या दुकानाचे कुलूप फोडले. दुकानातील साहित्य चोरले. जाताजाता दुकानात आग लावून दिली.

### पशुवैद्यक विद्याशाखेचा विस्तार होणार

**अकोला** : देशात ५० टक्के पशुवैद्यकांची कमतरता लक्षात घेऊन राज्यात पशुवैद्यक विद्याशाखेचा विस्तार करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. अकोला येथे कार्यरत स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्थेस जोडून नवीन पदवी पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. सन २०२३-२०२४ शैक्षणिक सत्रापासून महाविद्यालय सुरू करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतरच्या १६४ पदांसह ५८.०९ कोटींच्या खर्चास मान्यता ९ जूनला पशुसंवर्धन विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार देण्यात आली आहे.

### पीक विम्यासाठी मनसेचा राडा

**लातूर** : नैसर्गिक संकटांमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मात्र पीक विमा कंपनीने अत्यंत कमी नुकसान दाखवून काही शेतकऱ्यांचे तर शून्य नुकसान दाखवून नफेखोरी केली आहे. त्याचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फटका बसला आहे.

मनसैनिकांनी शेतकऱ्यांची परिस्थिती पाहता कार्यालयात जाऊन थेट जाब विचारला असता कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. अधिकाऱ्यांची भूमिका पाहून मनसेनं संताप व्यक्त करत कार्यालयात राडा केला. मनसेच्यावतीने पीक विमा कंपनीच्या कार्यालयाची तोडफोड करण्यात आली.

# महाविद्यालयांमधून 'राष्ट्रीय शिक्षण धोरण' मागे

सुराज्य/पुणे

**राज्य सरकारने राज्यातील सर्व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची (एनईपी) अंमलबजावणी करण्याचे पाऊल मागे घेतले आहे. राज्यातील सर्व महाविद्यालयांची अद्यापही तयारी नसल्याने सरकारने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे यंदा केवळ स्वायत्त महाविद्यालये, सर्व विद्यापीठांतील विभाग आणि पदव्युत्तर, पदवी अभ्यासक्रम राबविणाऱ्या कॉलेजांमध्ये 'एनईपी'ची अंमलबजावणी केली जाणार आहे. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी हा निर्णय जाहीर केला.**

### उर्वरित महाविद्यालयांसाठी धोरण ३० सप्टेंबरपर्यंत

पुढील वर्षी राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची १०० टक्के अंमलबजावणी केली जाणार आहे. त्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत सर्व विद्यापीठांना संभाव्य अडचणींचा आणि उपाययोजनांचा अभ्यास करून धोरणाच्या अंमलबजावणीबाबत स्पष्टता आणावी लागणार आहे. त्यांना ३१ डिसेंबरपर्यंत 'एनईपी'च्या अंमलबजावणीचा अंतिम आराखडा व आनुषंगिक धोरण तयार करावे लागणार आहे. त्यानंतर जानेवारीपासून राज्यात पुढील वर्षासाठी 'एनईपी' लागू करण्यात येणार आहे, असा कालबद्ध कार्यक्रम सरकारने निश्चित केला आहे.

राज्यातीलसर्वकला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांमध्ये यंदा नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याचा निर्धार यापूर्वी सरकारने व्यक्त केला होता. मात्र, या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विद्यापीठे आणि कॉलेजांसाठी मार्गदर्शक सूचना जारी करण्यास एप्रिल उजाडला. त्यामुळे केवळ दोन महिन्यांच्या कालावधीत विद्यापीठे आणि महाविद्यालयांना या धोरणानुसार अभ्यासक्रमात बदल करावा लागणार होता. तसेच, मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे चार वर्षांचा अभ्यासक्रम कसा राबवायचा, असा प्रश्न शिक्षक आणि महाविद्यालय व्यवस्थापनाकडून विचारला जात होता. त्यातून या धोरणाच्या अंमलबजावणीवर शिक्षण क्षेत्राकडून प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. तसेच विद्यापीठांच्या कुलगुरूंनीही या धोरणाची अंमलबजावणी एक वर्ष पुढे ढकलावी, अशी मागणी केली होती. अखेर यावर तोडगा काढत यंदा केवळ स्वायत्त कॉलेजांतील पदवी अभ्यासक्रम, विद्यापीठांचे विभाग आणि पदव्युत्तर महाविद्यालयांमधील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची अंमलबजावणी 'एनईपी'नुसार करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.



राज्यातील सुमारे ४५० महाविद्यालयांतील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांना 'एनईपी'ची अंमलबजावणी केली जाईल. उर्वरित कॉलेजांमध्ये 'एनईपी'ची अंमलबजावणी पुढील वर्षी केली जाणार आहे.

दरम्यान, विद्यापीठातील शैक्षणिक विभाग व राज्यातील पारंपरिक स्वायत्त महाविद्यालयांत पदवी व पदव्युत्तर स्तरावर बीए, बीकॉम, बीएस्सी, एमए, एमकॉम आणि एमएस्सी; तसेच २० एप्रिलच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या अन्य पारंपरिक अभ्यासक्रमांसह विद्यापीठांशी संलग्नित कॉलेजांतील पदव्युत्तर पदवीचे एमए, एमकॉम आणि एमएस्सी अभ्यासक्रम नवीन शैक्षणिक धोरणानुसार निश्चित केलेल्या क्रेडिट आराखड्यानुसार राबविले जातील. उर्वरित अस्वायत्त संलग्न महाविद्यालयांमध्ये सध्या सुरू असलेले अभ्यासक्रमच राबविले जातील.

राज्यातील उच्च शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील ८७ स्वायत्त महाविद्यालये व ५७ व्यावसायिक अशा एकूण १४४ स्वायत्त महाविद्यालयांमध्ये 'एनईपी'ची अंमलबाजवणी केली जाणार आहे. त्याचबरोबर काही दिवसांपूर्वी 'यूजीसी'ने राज्यातील आणखी ३६ महाविद्यालयांना नव्याने स्वायत्तता दिली आहे. तिथेही या धोरणाची अंमलबजावणी केली जाणार आहे.

### 'एनईपी'नुसार पाठ्यपुस्तके मराठीत

राज्यात नव्या शैक्षणिक धोरणात सर्व अभ्यासक्रम मराठीत आणण्यावर सरकारने भर दिला आहे. त्यानुसार यंदा पदवीच्या वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या अभ्यासक्रमाची काही पुस्तके मराठीत उपलब्ध करून दिली जाणार आहेत. ही पुस्तके तयार असल्याचे राज्याच्या शिक्षण विभागाने जाहीर केले आहे. त्यामुळे यंदा पदवीच्या विद्यार्थ्यांना विज्ञान आणि वाणिज्य शाखेचा अभ्यास मराठीतही करता येणार आहे.


# बिपरजॉय चक्रीवादळाचे मुंबईत थैमान

सुराज्य/मुंबई

देशाच्या अरबी समुद्राच्या किनारपट्टीवर घोंगावणारे बिपरजॉय चक्रीवादळ हे सध्या रौद्ररूप धारण करणार आहे. या चक्रीवादळाचा परिणाम महाराष्ट्रासह देशाच्या अनेक राज्यावर होताना दिसत आहे. अशात बिपरजॉय वादळामुळे गिरगाव चौपाटी भागात सोसाट्याच्या वारा वाहत आहे. त्यामुळे चौपाटीवरील वाळू वाऱ्याने रस्त्यावर येत असून रस्त्यावर धुळीचे साम्राज्य पाहायला मिळत आहे. या चक्रीवादळाचे रौद्ररुप दाखवणारा व्हिडिओही समोर आला आहे.

हवामान खात्याच्या माहितीनुसार, मुंबईपासून ७२० किमी किंवा त्याहून कमी अंतरावर दक्षिण पश्चिमेला हे वादळ पुढे सरकत असल्याचे म्हटले जात आहे. यामुळे राज्यातल्या अनेक भागांत धुवांधार पाऊस होईल, अशी माहिती हवामान खात्याकडून देण्यात आली आहे.

राज्याच्या कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या किनारी पट्ट्यामध्ये पावसाचा जोर आणखी वाढणार असून शनिवार आणि रविवारच्या



सुट्ट्यांसह ४ दिवसांमध्ये राज्याच्या तापमानाचा तडाखा वाढणार असल्याची माहिती हवामान खात्याचे तज्ज्ञ के. एस. होसाळीकर यांनी ट्विटरच्या माध्यमातून दिली आहे.

खरंतर, वारंवार होणाऱ्या हवामान बदलांचा परिणाम स्थानिक पातळीवरही पाहायला मिळतो. यामुळे सकाळच्या वेळी उष्णतेचा तडाखा आणि घामाच्या धारा पाहायला मिळतात तर संध्याकाळी मात्र पावसाच्या सरी बरसत असल्याचं वातावरण आहे. अशात किनारपट्टी भागांमध्ये घोंगावणारे हे चक्रीवादळ आणखी तीव्र होणार असल्यामुळे मच्छीमारांनाही खोल समुद्रात न जाण्याच्या सूचना हवामान खात्याकडून देण्यात आल्या आहेत.

### १०, ११ आणि १२ जून रोजी जास्तीत जास्त प्रभाव

अहमदाबादमधील हवामान विभागाच्या विज्ञान केंद्राच्या संचालक मनोरमा मोहंते यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'या चक्रीवादळामुळे १०, ११ आणि १२ जून रोजी वाऱ्याचा वेग ताशी ४५ ते ५५ नॉट्स वेगाने वाहू शकतो. वाऱ्याचा वेगही ६५ नॉट्सपर्यंत जाऊ शकतो. चक्रीवादळामुळे दक्षिण गुजरात आणि सौराष्ट्रासह किनारपट्टी भागात हलका पाऊस पडू शकतो. याबाबत सर्व बंदरांना कळविण्यात आले आहे.'

# महाविकास आघाडीत वाद, फडणवीसांनी डाव टाकला

सुराज्य/मुंबई

भाजपचे ज्येष्ठ नेते गिरीश बापट यांच्या निधनानंतर झालेली पोकळी भरून काढण्यासाठी भारतीय जनता पक्ष पुण्याचे माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांना निवडणुकीच्या रिंगणात उतवणार असल्याचे समजते. मुरलीधर मोहोळ हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या अतिशय जवळचे समजले जातात.

फडणवीस आणि मोहोळांची घनिष्ट मैत्री आहे. नुकतीच भाजपने राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी स्थानिक नेत्यांच्या खांद्यावर दिली आहे. पुणे लोकसभा मतदार संघाची जबाबदारी मुरलीधर मोहोळ यांच्यावर



सोपविण्यात आली आहे. त्यामुळे २०२४ साली पुणे लोकसभा मतदारसंघातून मुरलीधर मोहोळ लोकसभा लढवू शकतात, अशी शक्यता व्यक्त होत आहे. देवेंद्र फडणवीसांनी देखील मोहोळ यांना निवडणुकीची तयारी करण्याचे आदेश दिल्याची चर्चा पुण्यात आहे.

### जातीय तेढवाल्या पोस्टवर सायबर वॉच

सुराज्य/नागपूर

कोल्हापूरमधील जातीय दंगलीनंतर नागपुरातील कायदा व सुव्यवस्था बिघडू नये, यासाठी पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी बंदोबस्ताचे चक्रव्यूह आखले आहे.

समाजमाध्यमांद्वारे जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे वेळोवेळी समोर आले. त्यामुळे आता सायबर पोलिसांनी समाजमाध्यमांवर सायबर पेट्रोलिंग सुरू केली आहे. सायबर पोलीस तसेच संपूर्ण पोलीस स्टेशनमधील पोलिस निरीक्षकांना प्रत्येक पोस्टवर करडी नजर ठेवण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले आहेत.

# भाजपची लोकसभेसाठी अनोखी आयडिया

### देशभर चार हजार बैठकांमधून संवाद

सुराज्य/मुंबई

भारतीय जनता पक्षाने विधानसभा मतदारसंघानिहाय स्थानिक कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यासाठी 'टिफिन पार्टी'चे आयोजन सुरू केले आहे. स्थानिक कार्यकर्त्यांनी आपआपल्या घरून जेवणाचा डबा (टिफिन) आणायचा आणि प्रदेशाध्यक्ष, उपमुख्यमंत्री, विविध मंत्री तसेच उच्चपदस्थ नेत्यांसमवेत एकत्र जेवण करीत संवाद साधायचा, असे या पार्टीचे स्वरूप आहे.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी या 'टिफिन पार्टी'स सुरुवात केली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोलापूर



जिल्ह्यात, तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विदर्भात नुकतेच या 'टिफिन पार्टी'चे आयोजन केले होते. कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधण्यासाठी 'टिफिन पार्टी'चा पर्याय शोधण्यात आला असून, त्यानिमित्ताने त्या-त्या विधानसभा मतदारसंघातील शक्ती केंद्र प्रमुख तसेच इतर कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यात येत आहे.

येत्या काही महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्था, पुढील मार्च होणाऱ्या लोकसभा-विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांना सामोरे जाण्यापूर्वी भाजपने कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यासाठी या 'टिफिन पार्टी'चे केंद्रीय स्तरावरून आयोजन केले आहे.

अशा प्रकारच्या चार हजार बैठका देशभर घेतल्या जाणार आहेत. सुमारे तीन तास चालणाऱ्या बैठकीत एक तास मोदी सरकारच्या नऊ वर्षांतील कामगिरीवर चर्चा अपेक्षित आहे. त्यानंतर जेवणासोबतच संवाद साधण्यात येणार आहे. कार्यकर्ता आणि पक्षातील नेता, यामध्ये कुठलेही अंतर राहणार नाही, यासाठी हा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री अमित शाह या कार्यक्रमाची त्यांची सुरुवात नांदेड येथून करणार असल्याचे समजते.

### राज्यातील जलसाठा २६ टक्क्यांवर

सुराज्य/नागपूर

उन्हाळा संपण्याच्या मार्गावर असताना राज्यातील जलसाठा २६ टक्क्यांवर आला आहे. सर्वात कमी साठा १५.२१ टक्के पुणे विभागात उरला आहे. मृग नक्षत्राच्या पहिल्या दिवशी; गुरुवारी मान्सून केरळमध्ये दाखल झाला.

भारतीय हवामान विभागाकडून तशी अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. विदर्भात मान्सून पोहचण्यास अवधी असला तरी शेतकऱ्यांची लगबग वाढली आहे. उन्हाळ्यात विदर्भातील जवळपास सर्वच भागात मार्च, एप्रिल, मे महिन्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली. पहिल्यांदा उन्हाळ्यातही नद्या भरून वाहू लागल्या.

# राड्यामुळे १ हजार कोटी पंचगंगेत बुडाले

सुराज्य/कोल्हापूर

कोल्हापुरात झालेल्या दंगलीला रोखण्यासाठी प्रशासनाने जिल्ह्यातील इंटरनेट सुविधा तब्बल ४२ तास बंद ठेवली, याचा फार मोठा फटका आर्थिक उलाढालीला बसला. केवळ बँका, पतसंस्थाच नव्हे; तर अनेक दुकानांतील आर्थिक व्यवहारच ठप्प झाले. त्यामुळे दुकान उघडे असूनही व्यवहार मात्र झाले नाहीत. 'इंटरनेट बंद'चा फटका 'वर्क फ्रॉम होम' करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही बसल्याने आयटी क्षेत्राचे मोठे नुकसान झाले.

कोल्हापूर शहरातील काही युवकांनी आक्षेपार्ह स्टेटस ठेवल्यानंतर शहरात दंगल झाली. अनुचित प्रकार घडू नये म्हणून बुधवारी सायंकाळनंतर इंटरनेट सेवा बंद करण्यात आली. ही सेवा गुरुवारी दिवसभर; तर शुक्रवारी सकाळी दहापर्यंत बंद होती. ४० तासांपेक्षा अधिक काळ इंटरनेट बंद राहिल्याने जिल्ह्याच्या आर्थिक उलाढालीला मोठा दणका बसला.

सर्व प्रकारच्या दुकानांत, अगदी भाजीपाला खरेदीसाठीही हल्ली 'यूपीआय'च्या माध्यमातून व्यवहार केले जातात. इंटरनेट बंद असल्याने या आर्थिक व्यवहारांवर मर्यादा आल्या. जिल्ह्यात 'वर्क फ्रॉम होम' करणारे वीस हजारांहून अधिक कर्मचारी आहेत. इंटरनेट बंद राहिल्याने त्यांचेही काम ठप्प झाले. शाहू सुविधा केंद्रात मोठ्या प्रमाणात दाखले दिले जातात. यासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची पद्धत आहे. तिथेही कोणत्याही प्रकारचे दाखले दिवू शकले नाहीत.

१ हजार कोटींचा फटका

कोल्हापुरातील इंटरनेट सेवा ४० तासांहून अधिक काळ बंद असल्याने त्याचा मोठा आर्थिक फटका उद्योगांना बसला आहे. यामुळे १ हजार कोटींचे नुकसान झाले आहे, असा दावा कोल्हापूर चेंबर ऑफ कमर्सने केला आहे. कोल्हापुरातील इंटरनेट सेवा ही बुधवारी संध्याकाळी ५ वाजता बंद करण्यात आली आणि शुक्रवारी ही सेवा पूर्ववत केली गेली.

इंटनेट बंद झाल्यामुळे जवळपास एक हजार कोटींच्या व्यवहारांना फटका बसला. इंटरनेट सेवा बंद करण्याचा निर्णय हा अतिशय घाईत घेतला गेला. प्रशासनाने संपूर्ण इंटरनेट सेवा बंद करण्याऐवजी फक्त सोशल मीडिया ॲप्सवर बंदी आणायला हवी होती.

याकाळात ४० ते ५० टक्के ऑनलाइन ट्रॅन्झॅक्शन्स झाली. इंटरनेट नसल्याने अर्ध्याहून अधिक बाजार ठप्प होता. ई बिल जनरेट होत नव्हते आणि चेक पास होत नव्हते. याचा फटका व्यापाऱ्यांच्या जीएसटी साखळीलाही बसला आहे, असं कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे यांनी सांगितलं.



### आयटी सेक्टरला जवळपास १५ कोटींचा फटका

इंटरनेट बंदमुळे घरून काम करणाऱ्या १५ हजारांहून अधिक आयटी कर्मचाऱ्यांना रजा घ्यावी लागली. काही कर्मचारी हे सांगली आणि बेळगावला गेल्याने ते काम करू शकले. इंटरनेट बंदचा आयटी सेक्टरला १० ते १५ कोटींचा फटका बसला आहे, अशी माहिती कोल्हापूर आयटी असोसिएशनचे अध्यक्ष प्रताप पाटील यांनी सांगितलं. यामुळे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी अनेक आयटी कर्मचाऱ्यांना शनिवारी काम करण्यास सांगण्यात आलं आहे. शेअर बाजारात उलाढाल करणाऱ्यांनाही लाखोंचा फटका बसला आहे.

# भाकरी फिरवा... पण चूल कुठायं!

## राजकीय पक्षांची पदाधिकारी निवडीसाठी शोधमोहिम सुरु...

सुराज्य/शंकर जाधव

**राज्यात लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर येऊन ठेपल्या आहेत. एका पाठोपाठ या निवडणुकांचा धुराळा उडणार आहे. यामुळे राजकीय पक्षांचे नेते आणि कार्यकर्त्यांचा एकच गलका सुरू होणार आहे. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्षांमध्ये पदाधिकारी निवडीची उलथापालथ सुरू आहे. येत्या महिना-दीड महिन्यात विशेषत:: सोलापूर शहर-जिल्ह्यातील भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकाऱ्यांची उलथापालथ होणार आहे. अर्थात अलीकडे रूढ होत असलेला 'भाकरी फिरवणे' हे शब्द राजकीय पक्षांच्या नेत्यांनी बराच शोध लावून बाहेर काढले आहेत. कुठे जाईल तेथे राजकीय नेत्यांच्या तोंडी हे शब्द ऐकावयास मिळत आहे. खरतर भाकरी फिरवणे ही तितकी सोपी गोष्ट नसली तर ती राजकीय नेत्यांना चांगलीच जमत आहे. ते भाकरी फिरवण्याच्या मूडमध्ये आहेत. पण चुलीत विस्तवच नाही... त्यामुळे तवा तापेना... अशा स्थितीत तव्यावरील भाकरी कशी फिरवणार...?,असा प्रश्न उपस्थित होत आहे. अगदी अशीच स्थिती सोलापूर शहर-जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपामध्ये झाल्याचे दिसून येत आहे.**

आता भाजपाचेच घ्या ना. इतर पक्षाप्रमाणे भाजपानेही लोकसभा मतदारसंघनिहाय जिल्हाध्यक्ष नेमण्याचे धोरण आखले आहे. सुरुवातीला आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली. त्याप्रमाणे आ. कल्याणशेट्टी यांनी जिल्हाध्यक्ष पदाला न्याय देण्याची प्रयत्नही केला. पण अलीकडील काळात त्यांनी आमदारकी असल्याने जिल्हाध्यक्ष म्हणून पदाला न्याय देऊ शकत नसल्याची भावना व्यक्त करून जिल्हाध्यक्ष पदासाठी 'ना...ना' ची भाषा सुरू केली आहे. त्यामुळे सोलापूर लोकसभेसाठी भाजपाला नवा जिल्हाध्यक्षाचा शोध घ्यावा लागणार आहे. सोलापूर लोकसभा निवडणूक प्रमुख म्हणून विक्रम देशमुख यांची नियुक्ती झाल्याने त्यांच्या सल्लामसलतीवरच सोलापूर लोकसभेचा जिल्हाध्यक्ष नियुक्त केला जाणार असल्याचे संकेत आहेत.

इकडे माढा लोकसभा मतदारसंघ जिल्हाध्यक्षपदासाठीही भाजपाला शोधमोहीम हाती घ्यावी लागणार आहे. या मतदारसंघासाठी भाजपाचे माजी आ. प्रशांत परिचारक यांच्या खांद्यावर निवडणूक प्रमुख पदाची जबाबदारी सोपविली आहे. त्यामुळे येथे जिल्हाध्यक्ष नेमताना मोहिते-पाटील यांच्याबरोबरच परिचारक यांचीही भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. माढा लोकसभेच्या जिल्हाध्यक्षपदासाठी धैर्यशील मोहिते-पाटील यांचे नाव तसे आघाडीवर आहे. पण आता त्यांच्यावर माळशिरस विधानसभा मतदारसंघाची निवडणूक प्रमुख म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे त्यांच्या जिल्हाध्यक्ष निवडीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

जिल्हाध्यक्ष निवडीत भाजपापुढे जसा पेच उभा राहिला आहे. तसा सोलापूर शहराध्यक्ष निवडीच्या बाबतीत भाजपापुढे पेच उभा राहिला आहे. विद्यमान शहराध्यक्ष विक्रम देशमुख यांची मुदत मार्चमध्ये संपली असली तर तेच शहराध्यक्ष म्हणून काम पाहत आहे. आता त्यांची पुढची पायरी म्हणून सोलापूर लोकसभा निवडणूक प्रमुख म्हणून जबाबदारी घेतली आहे. त्यामुळे ते शहराध्यक्ष पदावरून मुक्त होणार, हे जवळपास निश्चित झाले आहे. आता त्यांच्या जागी दोन देशमुख आमदारांच्या सल्ल्याने शहराध्यक्ष निवडला जाणार आहे. पण दोन्ही देशमुख आपापल्या गटातील कार्यकर्त्यांचे घोडे पुढे दामटीत आहेत. या त्यांच्या वादात प्रदेश भाजपा शहर कार्यकर्त्यांचा कानोसा घेऊन शहराध्यक्ष नियुक्त करण्याचा शक्यता आहे. शहराध्यक्ष पदासाठी चन्नवीर चिट्टे, हेमंत पिंगळे, नरेंद्र काळे, अनंत जाधव, पांडुरंग दिड्डी यांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. यात वरिष्ठ पातळीवर चन्नवीर चिट्टे यांचे पारडे सध्या तरी जड झाले आहे. कारण ते दोन देशमुखांच्या कुठल्याच गटाशी बांधील नाहीत. ...आता हा प्रकार सोलापूर शहर-जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसमधला. जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बळीरामकाका साठे हे प्रकृतीच्या कारणांमुळे गेल्या वर्षभरापासून जिल्हाध्यक्ष पदापासून आपली सुटका करा, असे म्हणत आहेत. पण राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा खा. शरद पवार यांनी बांधून ठेवले आहे. त्यामुळे पक्षीय काम न करता ते केवळ नावापुरते पदावर आहेत. जिल्ह्यातील राष्ट्रवादीत ताळमेळ नसल्याने व नजीकच्या निवडणुकीत कोण कुठल्या पक्षात उडी मारेल याची शाश्वती नसल्याने वरिष्ठ नेत्यांचा कुणावर विश्वास राहिला नाही.




विशेष म्हणजे जिल्हाध्यक्ष पदासाठी कुणी उत्साह दाखवून पुढेही येईना. त्यामुळे जिल्हाध्यक्ष पदाचे राष्ट्रवादीचे भिजत घोंगडे आहे.

जिल्ह्याच्या राष्ट्रवादीत जशी गोंधळाची स्थिती आहे. तशी शहर राष्ट्रवादीमध्येही आहे. पण गुपचूप...गुपचूप...!, शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष भारत जाधव हे गेल्या सहा वर्षापासून अध्यक्षपदावर ठाण मांडून आहेत. सुरुवातीला त्यांचे अस्तित्व जाणवत नव्हते. पण शहरासाठी कार्याध्यक्ष म्हणून संतोष पवार यांची नियुक्ती होताच त्यांची शहरात पक्षाच्या कार्यक्रमावर जोर दिला. त्यामुळे त्यांच्या साथीने भारत जाधव यांचे महत्त्व वाढले. नंतर संतोष पवार यांची प्रदेश पातळीवर वर्णी लागल्याने त्यांनी शहरातून अंग काढून घेतले. दरम्यान माजी महापौर महेश कोठे, ॲड. यु. एन. बेरिया, सुधीर खरटमल यांचे महत्त्व पक्षात वाढल्याने राष्ट्रवादीचे जुने-जाणते नाराज होऊ लागले. त्यात भारत जाधवही आहेत. नजीकच्या काळात माजी महापौर महेश कोठे यांच्या हाती शहराची राष्ट्रवादी केंद्रित होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे पूर्वी काँग्रेसमध्ये 'कोठे ठरवेल ती पूर्वदिशा' होती, अगदी तशीस स्थिती राष्ट्रवादीत होण्याचे संकेत आहेत. त्यामुळेच भारत जाधव यांनी १५ दिवसांपूर्वी गुपचुपपणेच आपल्या शहराध्यक्षपदाचा राजीनामा प्रदेश



श्रेष्ठींकडे पाठवून दिला आहे. तसे त्यांना शहराध्यक्ष पदावरून हटवून त्यांच्या जागा सुधीर खरटमल, ॲड. यु. एन. बेरिया यांच्यापैकी एकाची किंवा आता नव्यानेच स्पर्धेत ओढून ताणून आणलेले बिज्जू प्रधाने यांची वर्णी लावण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. पाहूया, राष्ट्रवादीची शहराध्यक्ष पदाची लॉटरी कुणाला लागणार आहे ते, पण महेश कोठे यांच्या सांगण्यानुसारचती लॉटरी फुटणार आहे, एवढे मात्र निश्चित. काँग्रेसमध्ये शहर-जिल्ह्यात भाकरी तशी चांगलीची फिरली आहे. शहरात चेतन नरोटे आपला जम बसवित आहेत तर जिल्ह्यात धैर्यशील मोहिते-पाटील. जिल्ह्यात तालुकाध्यक्ष निवडीवरून थोडा अकांडतांडव झाला पण त्यावर पडदा पडला असला तरी अधूनमधून नाराजीची सूर ऐकावयास मिळत आहेत. यामुळे जिल्हा काँग्रेसमध्ये आजही 'रुसवे-फुगवे' तग धरुन आहेत. तसं शिवसेनेच्या दोन गटांपैकी ठाकरे गटाची सूत्रे पुरुषोत्तम बरडे आणि गणेश वानकर हलवित आहेत. तर शिंदे गटाची सूत्रे अमोल शिंदे, मनिष काळजे, मनोज शेजवाल आहेत. त्यावर संपर्क म्हणून प्रा. शिवाजी सावंत सूत्रे हलवित आहेत. या दोन गटात सध्या 'हाड-वैर' आहे. पाहुया निवडणुकीत याची प्रचिती येते का?. पण या दोन्ही गटाने फिरवलेली भाकरी मात्र सध्या तरी 'फिट्ट' बसली आहे.

एमआयएममध्ये सारे काही अलबेलच म्हणावे लागेल. नगरसेवक तौफिक शेख यांनी आपल्या पाच समर्थक नगरसेवकांना घेऊन राष्ट्रवादीत प्रवेश केल्याने एमआयएममध्ये अस्वस्थता असली तरी 'वजनदार' नेते म्हणून उदयास आलेले फारुक शाब्दी पक्षावर लक्ष ठेवून आहेत. पण तरीही एमआयएममध्ये ' इतना सन्नाटा क्यू है भाई' अशी कार्यकर्त्यांमध्ये चर्चा आहे. येथे पदाधिकारी निवडीची भाकरी फिरवण्याची भाषाच होत नाही, हे विशेष.

बाकी वंचित बहुजन आघाडी, रिपाइंचे विविध गट, आम आदी पार्टी यांच्यात भाकरी फिरवण्याचा प्रकार अद्याप तरी पुढे आला नाही. बघुया, आता नजीकच्या काळात कोण, कशी कणीक मळणार, चूल पेटवणार, तवा गरम करणार आणि पाणी लावून भाकरी फिरवणार?. पण काही का असेना सोलापूर फेमस भाकरी या निमित्ताने राजकारणात तरी चर्चेला आली, हे विशेष.

---

## 'पिपल्स'च्या वतीने अक्षय भालेराव हत्याकांड प्रकरणी धरणे आंदोलन

**सोलापूर** : नांदेड जिल्ह्यातील बोंडार हवेली गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली म्हणून अक्षय भालेराव याची हत्या केल्याच्या निषेधार्थ पिपल्स रिपब्लिकन पक्षाच्या वतीने सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात धरणे निदर्शने करण्यात आली. ही धरणे निदर्शने राजभाऊ इंगळे यांच्या नेतृत्वा खाली करण्यात आली.

यावेळी पक्षाचे प्रभारी अध्यक्ष अनिल सोनकांबळे, महादेव ओहाळ, अंकुश मडीखांबे, शाहू हत्तेकर, महेश कांबळे, बुवा बुचटे, गणेश चलवादी आदिंची भाषणे झाली असून या सर्वांनी आपली संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करून दोषी आरोपींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

आदोलनाप्रसंगी तात्या बनसोडे, बबलु कांबळे, दत्ता सर्वगोड, अर्चना चलवादी, लक्ष्मी सरवदे, धनंजय निकंबे, गौरव इंगळे, इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते. शेवटी ॲड. लौकीक इंगळे यांनी सर्वांचे आभार मानले.

## उचेठाण येथील दारू निर्मिती केंद्रावर धाड

सुराज्य/सोलापूर

तालुक्यातील उचेठाण गावाजवळ असलेल्या माण नदीच्या काठी एका हातभट्टी दारू निर्मिती केंद्रावर मंगळवेढाच्या पोलिसांनी धाड टाकून मोटारसहीत ५ लाख ८ हजार रुपयाचा माल जप्त केला . या प्रकरणात प जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला . ही कारवाई शुक्रवारी रात्रीच्या सुमारास करण्यात आली .

उचेठाण येथील जगताप वस्तीजवळ असलेल्या नदीच्या काठी हातभट्टी दारू तयार करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली . त्याप्रमाणे पोलिसांनी रात्रीच्या सुमारास घटनास्थळी धाड टाकली. त्या ठिकाणी ५० हजाराचे रसायन , प्लास्टिकचे बॅरल आणि एमएच०४-एफए-७२४४ या क्रमांकाची मोटर असा माल पोलिसांनी जप्त केला .

या प्रकरणी रणजीत विलास गायकवाड, पंकज विजयकुमार जाधव , तानाजी बाळू सलगर ,सारंग पोपट भोसले (सर्व रा. सोनके ता .पंढरपूर ) आणि हनुमंत श्रीकांत जाधव (रा.सोलापूर )अशा पाच जणाविरुद्ध मंगळवेढा पोलिसात दारूबंदी अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला .कारवाई पोलीस निरीक्षक रणजीत माने, फौजदार शेटे, हवलदार कोळी, विभुते, जाधव आणि त्यांच्या पथकाने केली.

### आत्महत्या प्रयत्न

सलगरवस्ती परिसरातील लिमयेवाडी येथे राहणाऱ्या मुकेश लक्ष्मण गायकवाड (वय ३५) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला . ही घटना आज शनिवारी सकाळच्या सुमारात घडली . त्याला फासातून सोडवून बंडू (भाऊ) यांनी शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. आजारात कंटाळून त्याने हा प्रकार केला. अशी नोंद सलगर वस्ती पोलिसात झाली आहे

### अक्कलकोट रोडवर दुचाकी चालक ठार

वेगाने जाणाऱ्या अनोळखी वाहनाच्या धडकेने दुचाकीवरील ३७ वर्षीय इसम गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान मयत झाले. हा अपघात अक्कलकोट मार्गावरील चव्हाण शोरूम जवळ शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडला . युवराज सुरेश आळंगे (वय ३७ रा. मल्लिकार्जुन नगर,रोशन शाळेजवळ)असे मयत झालेल्या दुचाकी चालकाचे नाव आहे. ते काल रात्री घरकुल कुंभारी येथून आपल्या घराकडे निघाले होते.

## प्रधानमंत्री आवास योजनेचे काम त्वरित सुरु करून लाभार्थ्यांना घरे द्या

### पालकमंत्री विखे-पाटील यांचे नगरपालिकेला आदेश

सुराज्य/पंढरपूर

सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर पंढरपूर येथे आले असता मनसेचे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी लाभार्थ्यांसहित पालकमंत्री यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देऊन लाभार्थ्यांना घर देण्याची विनंती केली . त्यावेळी पंढरपूर शहरातील पंतप्रधान आवास योजनेतील सर्व लाभार्थ्यांना त्वरित घरे मिळावीत आणि बंद पडलेले काम त्वरित सुरू करण्यात यावे असे पत्र महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते तथा सहकार सेनेचे प्रदेशाध्यक्ष दिलीप बापू धोत्रे यांनी पालकमंत्री याना दिले.

पंढरपुरात प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत दोन हजार घरे मंजूर झालेले आहेत, गेल्या तीन



वर्षांपूर्वी पंढरपूर नगरपालिकेने यासंदर्भात वर्तमानपत्रांमधून जाहिरात देऊन ज्या गोरगरीब गरजू लोकांना घरे पाहिजेत त्यांनी आपले नाव नोंदवून पैसे भरा असे सांगितले होते.

नगरपालिकेवर विश्वास ठेवून पंढरपूर शहरातील अनेक गोरगरीब लोकांनी बँकेकडून कर्ज काढून खाजगी सावकाराकडून व्याजाने पैसे घेऊन, घरातील सोन विकून आपल्या कष्टाचे पैसे स्वतःला राहायला घर मिळेल म्हणून भरले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत देशामध्ये एकही नागरिक बेघर राहणार नाही प्रत्येकाला स्वतःच हक्काचं घर असेल अशी घोषणा केली होती.

त्यामुळे संपूर्ण देशांमध्ये ही योजना अस्तित्वात आली परंतु पंढरपूर मध्ये पैसे भरून देखील लोकांना घरे मिळत नाही ज्या ठेकेदाराला काम दिले होते तो ठेकेदार काम अर्धवट सोडून निघून गेलेला आहे.

पंढरपूर शहरातील बंद पडलेली प्रधानमंत्री आवास योजना त्वरित सुरू करण्यासाठी संबंधितांना आदेश द्यावेत आणि ज्या ज्या लाभार्थ्यांनी पैसे भरलेले आहेत त्या सर्व लाभार्थ्यांना घरे मिळावेत अशी मागणी मागणी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली. पालकमंत्री यांनी याला सकारात्मक प्रतिसाद देऊन या विषयावर मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्याकडून सखोल माहिती घेतली आणि ताबडतोब याच्यावर उचित कारवाई करण्याचे आदेश सोलापूरचे जिल्हाधिकारी आणि पंढरपूरचे मुख्याधिकारी यांना दिले .यावेळी शहराध्यक्ष संतोष कवडे उपशहराध्यक्ष गणेश पिंपळनेरकर विक्रम पाटील, सर्वोत्तम कुलकर्णी, चैतन्य विधाते ,अजिंक्य अष्टेकर, सुलेखा आधटराव, गौरी उपासे, सागर वाघमारे, संयुक्त कुलकर्णी, उत्तम कुलकर्णी,सुलोचना दोशी इत्यादी उपस्थित होते.

---



## अरण्यऋषी चितमपल्ली यांना ग्रंथ प्रदान

सुराज्य/सोलापूर

नागपूर येथील डॉ.अश्विनी देहाडराय यांनी चितमपल्ली यांच्या साहित्याचे अध्ययन करून 'मारुती चितमपल्ली एक अध्ययन ' हा ग्रंथ लिहिला आहे. तो नागपूर येथील साहित्य प्रसार केंद्राने प्रसिध्द केला आहे. या ग्रंथाची पहिली प्रत अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांना प्रदान करण्यात आली.

डॉ. देहाडराय नागपूरहून खास सोलापूरला आल्या अन त्यांनी ही प्रत दिली. यावेळी निसर्ग साहित्याचे आणि अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या साहित्याचे अभ्यासक प्रा.डॉ.सुहास पुजारी यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी चितमपल्ली म्हणाले, माझ्या साहित्याविषयीचे महत्त्वपूर्ण अध्ययन आणि संशोधन प्रा. डॉ. पुजारी यांनी केले. त्यानंतर माझ्या संपूर्ण निसर्ग लेखनाचे अध्ययन, संशोधन अनेक अभ्यासक करीत आहेत, त्यावरील ग्रंथही ते प्रकाशित करीत आहेत, याचे समाधान आहे. यावेळी डॉ. अश्विनी देहाडराय म्हणाले, अरण्यऋषी चितमपल्ली यांच्या निवासस्थानी झालेल्या भेटीमध्ये निसर्ग, पर्यावरणाविषयीची आस्थेने चर्चा झाली.

## भर कार्यक्रमातून आ.सुभाष देशमुखांनी लावला सहाय्यक पोलीस निरीक्षकांना फोन

### अवैध दारू विक्री बंद करण्याची केली मागणी

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये बिनधास्तपणे अवैध दारूविक्री सुरू असल्याची वस्तुस्थिती आहे. विशेष म्हणजे, दारूबंदीचे ठराव होऊनही हातभट्टीची विक्री थांबलेली नाही. असाच एक अनुभव दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोळकवठा गावातील एका कार्यक्रमाच्या निमित्ताने गेलेले भाजप आमदार सुभाष देशमुख यांना आला. त्यावेळी त्यांनी मंद्रूप पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मांजरे यांना कॉल लावला आणि अवैध दारू विक्री बंद करण्याची सूचना केली.



बोळकवठा या गावात आमदार निधीतून मंजूर झालेल्या तीन कोटी ६० लाख रुपयांच्या रस्त्याच्या भूमिपूजनाला शनिवारी आमदार सुभाष देशमुख गेले होते.

त्यावेळी तेथे उपस्थित महिलांनी गावातील अवैध दारू विक्रीसंदर्भातील माहिती आमदार देशमुख यांना दिली. दारूबंदी करावी, अशी मागणी त्यांनी आमदारांकडे केली. रस्त्याच्या भूमिपूजनाची सभा सुरू असतानाच आमदार देशमुख यांनी त्यांच्या खासगी स्वीय सहाय्यकाच्या माध्यमातून मंद्रूप पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक मांजरे यांना कॉल लावला. आमदार देशमुख यांनी फोनवरून पोलीस निरीक्षकांना म्हणाले की, बोळकवठा येथील लोकांनी मला अडविले आहे. ते म्हणत आहेत, की तुमच्या आशीर्वादानेच दारूविक्री सुरू आहे की काय. मी त्यांना म्हणातोय, मी या गावात कधी येतो, कधी जातोय तर का? त्यामुळे यात माझा हात कसा असेल?

गावातील लोकांनी माझ्यावर केलेले आक्षेप तेवढे खोडून काढण्याचा प्रयत्न करा.

वेळप्रसंगी अवैध दारू वाहतूक व विक्री करणाऱ्यांना आपला दंडुका दाखवा आणि हे गाव व्यसनापासून कसे दूर राहील, याकडे विशेष लक्ष द्या. गावातील लोकांचे पुण्य तुम्हाला मिळेल', असे म्हणत आमदार देशमुखांनी दारुविक्रीवर नियंत्रण आणण्याची मागणी केली.

### म्हणजे माल लयं हायं वाटतं...

मंद्रूप पोलिस ठाण्याच्या हद्दीत गावठी दारूची एकही हातभट्टी नाही. बाहेरून विक्रीसाठी येणाऱ्या दारू वाहतुकीवर आमचे विशेष लक्ष आहे. जानेवारी २०२२ ते मे २०२३ या काळात ८९ गुन्हे दाखल केल्याचे पोलिस निरीक्षक मांजरे यांनी आमदार देशमुखांना सांगितले. बाहेरून अवैध दारूची वाहतूक करणाऱ्यांवर १५ गुन्हे दाखल केले आहेत. या पुढील काळात देखील विशेष लक्ष देऊन अधिक कठोर कारवाई करण्याची ग्वाही सहाय्यक पोलीस निरीक्षक मांजरे यांनी आमदार देशमुख यांना दिली. त्यावेळी देशमुख म्हणाले, एवढ्या कारवाया करूनही दारूबंदी झाली नाही, म्हणजे लय माल हायं वाटतं'.



## राष्ट्रवादी पक्ष माळशिरस तालुक्यात मुसंडी मारेल : अक्षय भांड

सुराज्य/नातेपुते

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तळागाळातील लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी आणि येणाऱ्या निवडणुकीत माळशिरस तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला यश मिळावे यासाठी मी व माझे सहकारी नेहमी प्रयत्न शील आहोत. माळशिरस तालुक्यात शरद पवार व अजित पवार यांना माननारा गट मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे सभासद नोंदणीस चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळत आहे. सभासद नोंदणी उपक्रमची सुरूवात नातेपुते येथून करण्यात आली असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा माळशिरस तालुक्यात मुसंडी मारणार असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अक्षय भाड यांनी केले. ते नातेपुते येथील संपर्क कार्यालयात सभासद नोंदणी प्रसंगी बोलत होते.

यावेळी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष शमशुद्दीन मुलाणी, सत्यजित सुरूवसे, प्रथमेश पांढरे, राजन चौघुले, संकेत लाळगे, तुषार लंबाते, कुशाल बोंडवे, अमिर बागवान, विजय बरडकर, अदित्य आडके, सागर माने, रोहित काळे, संग्राम जाधव, दिपक घाडगे हे उपस्थित होते.

---

## तरुणांनो व्यसनाधीन होण्यापेक्षा व्यावसायिक व्हा : आ.देशमुख

### बोळकवठे ते नांदणी रस्त्याचे आ.सुभाष देशमुख यांच्या हस्ते भूमिपूजन

सुराज्य/दक्षिण सोलापूर

सध्या तरुण युवा पिढी ही व्यसनाधीन होत आहे. व्यसनाधीन होण्यापेक्षा व्यावसायिक व्हा गावातील तरुणांनी एकत्र येऊन व्यवसाय सुरू करून बोळकवठे गावाचे नाव सुद्धा चिंचणी गावाप्रमाणे संपूर्ण महाराष्ट्रात होईल असे काम करावे असे आव्हान आ.सुभाष देशमुख केले.दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोळकवठे ते नांदणी रस्त्यासाठी तीन कोटी साठ लाख रुपये मंजुर झाले असून या रस्त्याचे भूमिपूजन दक्षिण सोलापूर तालुक्याच्या आमदार सुभाष देशमुख यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

यावेळी या कार्यक्रमाला आप्पासाहेब पाटील-वडकबाळकर, चनगोंडा हवीनाळे, माजी उपसभापती संदीप टेळे, दिपाली व्हनमाने,



संगप्पा केरके, एम.डी.कमळे, गुरणा तेली, सरपंच रफिक नदाफ, प्रकाश पुजारी, यतिन शहा, अण्णाराव पाटील, सुरेश बगले, आप्पासाहेब मोटे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना सुभाष देशमुख म्हणाले की, सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील अवघ्या ४०० कुटुंब संख्या असलेल्या चिंचणी गावाचा आदर्श बोळकवठे गावांनी घ्यावा. गावातील युवकांनी व महिलावर्गांनी एकदा तरी चिंचणी गावाला भेट द्यावी. गावातील प्रत्येक महिलांनी एक झाड तर लावावे तसेच ग्रामपंचायतीने एक मुल एक झाड ही संकल्पना राबवावी मी आपल्या गावासाठी आतापर्यंत कोट्यावधीचा निधी दिला तर आपण सर्वांनी मला व्यसनदान करण्याचा वचन द्या.

बोळकवठे गावाचा दर्जा वाढवण्यासाठी युवकांनी एकत्र येऊन दुग्ध व्यवसाय, शेळीपालन सह इतर व्यवसाय करावे. अनेक शासकीय योजना असून ग्रामपंचायतीनी त्याचा लाभ घ्यावा यासाठी मी सर्वतोपरी सहकार्य करीन असेही यावेळी सुभाष देशमुख म्हणाले. यावेळी लक्ष्मण आरवत, बापू पाटील, प्रशांत सलगर, यलगोंडा बिराजदार, महादेव बनगोंडे, सरपंच धर्मराज पुजारी, अण्णाराव पाटील आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन बनसिध्द वडरे यांनी केले.

## निराळेवस्ती येथे फरशी आणि दगडाने मारहाण

**सोलापूर** : कपडे वाळविण्याच्या कारणावरून दगड,फरशी आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत एकाच घरातील तिघेजण जखमी झाले . ही घटना शहरातील निराळेवस्ती येथे आज शनिवारी दुपारच्या सुमारास घडली. सर्व जखमीना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले .

प्रभाकर जनार्दन भोसले (वय ५० ) त्यांची पत्नी वैशाली (वय ४५ ) आणि मुलगा राज भोसले (वय २० सर्व रा.निराळे वस्ती ) अशी जखमींची नावे आहेत.